CMYK

## मंगळवेढ्यासह ग्रामीण भागात पाऊस

मंगळवेढा : मृग नक्षत्र कोरडा गेल्याने शेतकरी पावसाची आतुरतेने वाट पाहत होते. आद्र नक्षत्राच्या सुरुवातीस मंगळवेढ्यासह परिसरात सायंकाळी ५ ते ६ च्या दरम्यान अर्धा ते पाऊण तास बरसलेल्या सरीने हवेत उष्णता कमी होऊन गारवा निर्माण झाला आहे. शेतकरी खरीप पेरणीसाठी सज्ज झाला असून वरुण राजाच्या येण्याने सुखावला आहे. पावसाची दमदार हजेरी मंगळवेढ्या शहरासह ग्रामीण भागातही लागली आहे. जूनच्या पहिला आठवडा उलटून ही मृग नक्षत्र कोरडे गेले. माचणूर,ब्रम्हपुरी,मरवडे, भाळवणी या भागात देखील पावसाने हजेरी लावली आहे. पाऊस लांबल्याने विहिरी,बोअर मधील पाण्याची कमतरता मोठ्या प्रमाणात जाणवू लागल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. पावसाची आद्र नक्षत्रात सुरुवात झाल्याने शेतकऱ्याने समाधान व्यक्त केले आहे. खरीप पेरणीसाठी पावसाची आणखी गरज असून पावसाच्या प्रतीक्षेत सर्वजण आहेत.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## अन्नातून ४ मुलांना विषबाधा

मंगळवेढा : जेवणातून विषबाधा झाल्याने चार मुलांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . ही घटना भगतवाडी (ता.करमाळा) येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली. आरती प्रकाश काळे (वय ९वर्षे) त्याचा भाऊ संकेत काळे (वय ७ वर्षे), पदू काळे (५वर्षे) आणि छकुल्या प्रकाश (काळे वय ४ वर्षे सर्व रा.भगतवाडी ता.करमाळा) अशी लागण झालेल्या मुलांची नावे आहेत. त्यांना करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रात्री ८ वाजता घरात जेवण केल्यानंतर त्यांना चक्कर आली होती. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



www.surajyadigital.com | शनिवार, दि. २४ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २६५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# बाळे चौकात चार वाहनांचा विचित्र अपघात; महिला ठार

## पोलिसांच्या नाकाबंदीवर नागरिकांची तक्रार

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर-पुणे महामार्गावर बाळे पुलावर कंटेनर चालकाने अचानकपणे ब्रेक मारल्याने मागून येणाऱ्या चार वाहनांची धडक झाली. या विचित्र अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. ही घटना शुक्रवारी दुपारी घडली. अपघातानंतर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. मोहोळ तालुक्यातील अनगरचे गणेश व सुप्रिया नरखेडकर हे पती-पत्नी दुचाकीवर सोलापूरकडे येत होते. त्यावेळी वेगाने सोलापूरकडे येणाऱ्या हायवाने दुचाकीला धडक दिल्याने सुप्रिया यांचा मृत्यू झाला तर पती गणेश हे जखमी झाले. या अपघातामुळे बराच काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. त्यानंतर नागरिकांनी भर रस्त्यात मृतदेह समोर ठेवून ठिय्या आंदोलन केल्याने पोलिसांची एकच तारांबळ उडाली.**

### संतप्त नागरिकांनी मृतदेहासमोर बसून केला रास्ता रोको



बाळे ब्रीजजवळ पोलीस प्रशासनाच्या वतीने नाकाबंदी केली होती. नाकाबंदी मध्ये मोठा कंटेनर थांबला त्याला पाठीमागून ट्रक, कार एकमेकावर येवून धडकले. दरम्यान नरखेडकर पती-पत्नी दुचाकीवर सोलापूरकडे येत होते. त्यावेळी हायवाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.दरम्यान अपघातस्थळी गर्दी झाली होती. दरम्यान शिवसेनेचे शिंदे गटाचे माजी नगरसेवक अमोल शिंदे व नागरिकांनी आंदोलन सुरु केले. ही घटना समजताच फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ सिद हे घटनास्थळी आले त्यांनी नागरिकांची आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांची समजूत काढली.

यानंतर पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी अपघाताच्या ठिकाणी धाव घेत नागरिकांची समजूत घातली व जखमींना उपचारासाठी दाखल केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी माहिती दिली. सोलापूर-पुणे महामार्गावर सोलापूर शहराजवळ बाळे पुलावर शुक्रवारी दुपारी अचानकपणे कंटेनरने ब्रेक मारला आणि वाहन थांबवले. दरम्यान पाठीमागून वेगाने येणाऱ्या हायवाने कार व दुचाकीला ठोकरून डंपरवर आदळला. यात हायवा, कार व कंटेनरचे नुकसान झाले आहे.



"अपघाताची माहिती कळाल्यावर मी आणि पीआय घटनास्थळी तातडीने आलो. लोक रस्त्यावर उतरले होते. गर्दीमुळे वाहतूक खोळंबली होती परंतु नागरिकांशी चर्चा केल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. रस्त्यात कंटेनर अचानक थांबवल्यामुळे हा अपघात झाला. पाठीमागून भरधाव वेगाने येणारी स्वीफ्ट डिझायर ही गाडी डंपरला धडकली. त्यानंतर वेगाने येणारी कारही आदळली. कंटेनर थांबण्याची गरज नव्हती. बकरी ईदमुळे दरवर्षी वाहने तपासली जातात. त्यामुळे बॅरिगेटस लावली जातात. त्यामुळे बॅरिगेटसचा या अपघाताशी काहीच संबंध नाही.

**- विजय कबाडे, पोलीस उपायुक्त**

### शिवसेनेचा भर रस्त्यात राडा...बघ्यांची गर्दी



शिवसेना (शिंदे गट) जिल्हाध्यक्ष आणि सोलापूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अमोल बापू शिंदे हे देखील अपघाताच्या ठिकाणी दाखल झाले. पोलिसांनी नाकाबंदी केल्याने वाहने थांबली आणि हा अपघात घडल्याचा आरोप त्यांनी केला. डंपर चालकावर खुनाचा गुन्हा दाखल करा, तसेच त्याला अचानकपणे ब्रेक मारायला लावणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल करा, अशी मागणी करत त्यांनी नागरिकांची बाजू घेतली. यावेळी अमोल शिंदे यांची पोलिसांसोबत बाचाबाची झाली. पोलिसांनी बॅरिगेटस् लावल्याने डंपर चालकाने कंटेनर थांबवला, असा आरोप यावेळी नागरिक करत होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणून वाहतूक सुरळीत केली.

### दवाखान्यात दाखविण्यासाठी येत होते

मृत सुप्रिया गणेश नरखेडकर व त्यांचे पती गणेश भारत नरखेडकर हे दोघे दुचाकीवर अनगरहून सोलापूरकडे येत होते. बाळे पुलावर आले असता दुपारी साडेबारा वाजता त्यांच्या मागून येणाऱ्या हायवाने धडक दिल्याने हा अपघात झाला. गणेश नरखेडकर यांच्या पत्नी सुप्रिया यांना कानाचा त्रास असल्याने डॉक्टरांना दाखविण्यासाठी ते सोलापूरला येत होते.

"बाळे परिसरात करण्यात आलेली नाकाबंदी वेगळ्या कारणासाठी केली गेली. पोलीस वाहनचालकांकडून पैसे वसुल करत असल्याचे पुरावे नागरिकांकडे आहे. पोलिसांच्या चुकीच्या धोरणामुळे एका महिलेचा नाहक बळी गेला आहे. याला जबाबदार असणाऱ्या कारवाई झाली पाहिजे हा प्रश्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तक्रार करणार आहोत.

**- अमोल शिंदे (शिवसेना जिल्हाप्रमुख)**

## चिमणी पाडायची गरजच नव्हती : शिंदे

सुराज्य/सोलापूर

सिद्धेश्वर कारखान्याची चिमणी नियमित करण्याचा धर्मराज काडादींचा प्रयत्न होता. मी सत्तेमध्ये असताना जर लक्षात आले असते तर मी चिमणीला नियमित केले असते, असे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी स्पष्ट केले. सिद्धेश्वर साखर कारखान्याची चिमणी पाडण्याची गरज नव्हती, असे ते म्हणाले.

माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी शुक्रवारी सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक धर्मराज काडादी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. शिंदे म्हणाले की, कारखान्याची चिमणी पाडण्याची गरज नव्हती. एका बाजूने विमान उतरतात. पायलटला सूचना केल्यानंतर ते त्या पद्धतीने विमाने उतरविणे आणि टेक ऑफ या गोष्टी करतात. पण वाटोळंच करायचं म्हंटल्याने त्यांनी ते केले आहे.



### तेलंगणा राज्य माझ्या सहीने निर्माण झाले

बीआरएस पक्षाबद्दल बोलताना ते म्हणाले, मी देशाचा गृहमंत्री असतानाच आंध्र प्रदेशातून तेलंगणा राज्य माझ्या सहीने निर्माण झाले आहे. त्यांची काय स्थिती होती, हेसुद्धा मला माहित आहे. अशा परिस्थितीमध्ये ज्यांची काही ताकद नाही, असे लोक सुध्दा येतात. पण, ते देशावर कधीच राज्य करू शकत नाहीत.

### चंद्रशेखर राव यांना शिक कढई फार आवडेल

तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांचे सोलापुरात स्वागत आहे. त्यांना सोलापूरची शिक कढई फार आवडेल, असे पक्ष देशावर राज्य करू शकत नाहीत, असे म्हणत शिंदे यांनी राव यांना चिमटा काढला.

### काँग्रेस सत्तेत आल्यावर चिमणी पुन्हा बांधू : पटोले

चिमणी पाडणाऱ्यांना आता मतपेटीतून आपल्याला पाडायचे आहे. हे काम भाजपाचेच आहेत. काँग्रेस सरकार सत्तेत आल्यावर चिमणी पुन्हा बांधून देऊ, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. पटोले यांनी शुक्रवारी सायंकाळी कारखान्यास्थळी भेट दिली. ते म्हणाले, एका माजी मंत्र्यांचे घर अतिक्रमणच्या जागेवर त्याचे आपल्याकडे पुरावे आहेत. ते अधिवेशनात सादर करणार असल्याचे पटोले म्हणाले. यावेळी धर्मराज काडादी, सिद्धाराम म्हेत्रे, विश्वनाथ चाकोते, जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, विजयकुमार हत्तुरे, प्रा. काकासाहेब कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## बीआरएसमुळे काँग्रेसला फरक पडणार नाही : पटोले

सुराज्य/सोलापूर

बीआरएसच्या महाराष्ट्रातील एन्ट्रीमुळे काँग्रेस पक्षाला कोणताही फरक पडणार नाही, त्यांचे रेट ठरलेले आहेत, त्यांचे पैशाच्या भरवशावर काम सुरू आहे, असे गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे दोन दिवस दौऱ्यावर आहेत. सोलापुरात आल्यानंतर आमदार प्रणिती शिंदे यांनी पटोले यांचा सपत्नीक, सकुटुंब सत्कार केला. त्यानंतर पटोले यांनी माध्यमांशी संवाद साधला. बीआरएस पक्षासारखे किती आले, किती गेले आपण पाहिले आहे. महाराष्ट्रात १९९९ मध्ये उत्तरप्रदेशाचा एक पक्ष आला होता. या आधी हैद्राबादचा एक पक्ष आला होता. आता दुसरा येतोय याने काहीही फरक



पडणार नाही. चार लोकांना मदत करायची, त्याचा व्हिडिओ बनवायचा आणि खोटा प्रचार करायचा. हा गुजरात पॅटर्न लोकांनी पाहिला, तोच आता तेलंगणा पॅटर्न झाला आहे, असेही नाना पटोले यांनी स्पष्ट केले. तेलंगणाचा शेतकरी किती अडचणीत आहे, सामाजिक व्यवस्थेत किती बिघाड आहे, हे तिथल्या लोकांना माहिती आहे. तेलंगणातील काँग्रेसचे नेते इथे प्रचाराला येतील आणि तेलंगणातील शेतकऱ्यांची वस्तुस्थिती सांगतील, असेही पटोले यांनी नमूद केले.



## माऊलींच्या पालखीचे जिल्ह्यात आगमन

### धर्मपुरी येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले पालखीचे स्वागत

सुराज्य/नातेपुते

आषाढी वारी सोहळ्यात विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन आळंदी येथून निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे शुक्रवारी सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन झाले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पालखीचे स्वागत करून माऊलींच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.

धर्मपुरी येथे पालखी स्वागतासाठी पालकमंत्री श्री. विखे-पाटील यांच्यासह खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, परभणीचे खासदार संजय जाधव, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, आमदार राम सातपुते, आमदार जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू रजनीश कामत, अतिरिक्त जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, अकलूजचे उपविभागीय अधिकारी नामदेव टिळेकर, माजी आमदार रामहरी रूपनवर यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. माऊलींच्या पालखी स्वागतापूर्वी पालखी सोहळ्यातील अश्वाचे पूजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# विश्वविक्रमी शिबिरापेक्षा चारपट मोठे होणार महाआरोग्य शिबिर

- भक्तीच्या पालखी सोहळ्यात आरोग्याचा मेळा
- २० लाख वारकऱ्यांसाठी डॉक्टरांचा ताफा

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



राजकीय इच्छाशक्ती नव्हती, आता पावसाची पण नाही !

कल्याण

**346-33-139**

सुराज्य/सोलापूर — Spot Report

**परंडा येथे पाच लाख नागरिकांची तपासणी करून विश्वविक्रम केलेल्या सावंत बंधूंनी त्याहीपेक्षा भव्य चारपट मोठे अर्थात २० लाख नागरिकांच्या तपासणीसाठी महाआरोग्य शिबिर पालखी मार्गावर तीन ठिकाणी आयोजित केले आहे. या रेकॉर्डब्रेक शिबिरासाठी ५ हजार डॉक्टरांचा ताफा असणार आहे. भक्तीच्या पालखी सोहळ्यात होणारा आरोग्याचा मेळा यंदा आकर्षण ठरणार आहे. दरम्यान 'सुराज्य' टीमने प्रा.शिवाजी सावंत यांची पंढरपुरात भेट घेतल्यावर त्यांनी शिबिराबाबत सविस्तर माहिती दिली.**

प्रा. शिवाजी सावंत म्हणाले की, राज्यभरातून शेकडो किलो मीटर पायी चालत जवळपास ४६३ दिंड्या पंढरपूरकडे निम्म्यापेक्षा जास्त अंतर कापत पुढे वाट चालत आहेत. वाखरी येथील पालखी तळासमोर पहिला मोठा कॅम्प उभारला असून येथे जवळपास पाच हजार डॉक्टर आणि वैद्यकीय स्टाफ हजारो वारकऱ्यांवर २७ आणि २८ आणि २९ असे तीन दिवस तपासणी आणि उपचार करणार आहेत. आरोग्य शिबिरासाठी स्वतंत्र वॉर रूम कार्यान्वित केली आहे. पालखी प्रस्थान ते पालखी प्रवास या दरम्यान ऑक्सिजन, रक्तसाठा यासह १०८ रुग्णवाहिकेसह बाईक अँब्युलन्स तयार ठेवण्यात आल्या आहेत. चंद्रभागेच्या दोन्ही तीरावरही १० खाटांचे तात्पुरत्या स्वरूपात दवाखाने कार्यरत ठेवण्यात आले आहेत. महाशिबिरांच्या ठिकाणी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह अग्निशमन यंत्रणा, फिरते शौचालय, फिजिओथेरपी यंत्रणा आहे.



CERTIFICATE

INTERNATIONAL WORLD RECORDS OF EXCELLENCE BOOK OF RECORDS

RECORD HOLDER

DR. TANAJIRAO SAWANT, SHRI SHIVAJI RAO SAWANT, DR. DILIP PAWAR, DOCTOR 365

THE WORLD RECORD OF "LARGEST MEDICAL CAMP ORGANISED" WAS ACHIEVED BY DR. TANAJIRAO SAWANT & SHRI SHIVAJI RAO SAWANT & DR. DILIP PAWAR & DOCTOR 365 (INDIA) ON 28TH NOVEMBER 2022 FROM MUMBAI (MAHARASHTRA) INDIA. THEY ORGANIZED THE LARGEST MEDICAL CAMP IN BHUM PARANDA (OSMANABAD), MAHARASHTRA IN WHICH 3,07,000 (THREE LAC SEVEN THOUSAND) PEOPLE PARTICIPATED AND GOT THEIR MEDICAL CHECK-UP DONE BY 1800 DOCTORS.

SALUTE THE TALENT

WWW.INTERNATIONALBOOKOFRECORDS.COM

परंडा येथील शिबिराच्या विक्रमाची नोंद झालेले प्रमाणपत्र



### At-A-Glance

- माऊली पालखी मार्गावर ३ अॅम्ब्युलन्स, ३० बाईक अॅम्ब्युलन्स
- तुकोबा पालखी मार्गावर ४ अॅम्ब्युलन्स, ४७ बाईक अॅम्ब्युलन्स
- दोन्ही ठिकाणी भव्य टेंट ▸ १० बेड हॉस्पिटल ▸ ३ आरोग्य रथ

- वाखरी ▸ चंद्रभागा नदीच्या अलीकडे(तीन रस्ता)
- गोपाळपूर येथे २७, २८, २९ रोजी तीन दिवस शिबीर
- ३ एकरमध्ये एक असे एकूण ३ कॅम्प
- ५०००+ डॉक्टर ▸ सरकारी यंत्रणेचा मोजका वापर



- भैरवनाथ शुगर आणि एनजीओ मार्फत कॅम्पमध्ये नाश्त्याची सोय
- गरजूंना मोफत चष्मा व कानाचे मशीन वाटप
- अर्ध्या तासात आरोग्य तपासणी व्हावी अशी यंत्रणा




- आषाढीनंतर कार्तिक एकादशीला ही शिबीर होणार
- दरवर्षी महाआरोग्य शिबीर घेण्याचा सावंत बंधूंचा मानस

### आरोग्य मंत्री बैठकांमधून घेताहेत आढावा



आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या पुढाकारातून महाआरोग्य शिबिर होत आहे. एक-दोन दिवसाला संपूर्ण प्रशासन, अधिकारी, डॉक्टरांची बैठक घऊन ते शिबिराचा आढावा घेत आहेत. पालखी मार्गावरील सर्व दवाखाने त्यांनी चालू ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. आरोग्य मंत्री सावंत यांनी महाशिबिरांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन प्रशासनाने केलेल्या नियोजनाची व सोयीसुविधांची पाहणी करत आहेत.

### शिवाजी सावंत, अनिल सावंत यांचे जातीने लक्ष





या संपूर्ण महाआरोग्य शिबिराची यंत्रणा पंढरपूर येथील सांवत निवास येथून प्रा. शिवाजी सावंत आणि त्यांचे पुतणे अनिल सावंत हातळत आहेत. प्रत्येक बारीक सारीक गोष्टींवर ते जातीने लक्ष देताना दिसत आहेत. डॉक्टरांची राहण्याची, जेवण्याची व्यवस्था तसेच शिबिरासाठी काम करत असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या व्यवस्थेचे उत्तम नियोजन दोघांकडून होत आहे.

### परदेशी डॉक्टरही करणार उपचार

महाआरोग्य शिबिरात ३२ प्रकारच्या तपासण्या आणि त्यावरील उपचाराची व्यवस्था केली आहे. फिरते दवाखान्याच्या मदतीने रुग्णांना तातडीचे उपचार दिले जाणार आहेत. यासाठी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक या भागातील मोठ्या रुग्णालयातील डॉक्टर्स तसेच परदेशातील ५ तज्ज्ञ डॉक्टरही वारकऱ्यांवर उपचार करणार आहेत.

CMYK

# ईडीची छापेमारी...

ईडीची पिडा संपली, असे राज्याला वाटत होते परंतु ईडी अजूनही काही जणांवर डोळा ठेवून आहे,असे मुंबईच्या छापेमारींवरून म्हणता येईल. त्यात मुंबई पालिकेतील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही समावेश होता. करोनाच्या काळात मुंबई पालिकेत घोटाळा झाल्याची ओरड झाली. त्यावेळी त्याचे गांभिर्य कुणाला वाटले नाही पण कॅगचा अहवाल आल्यानंतर जी ओरड त्यावेळी झाली,त्यात तथ्य होते याची जाणिव आता झाली. करोना महासाथीच्या काळात जम्बो कोविड सेंटर्स उभारताना ३८ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात येतो. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक म्हणजेच 'कॅग'नेदेखील मुंबई महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा अहवाल सादर केला. त्यानंतर आता सक्त वसुली संचालनालय अर्थात ईडीने मुंबई तसेच उपनगर परिसरांत वेगवेगळ्या १४ ठिकाणी छापेमारी केली. २८ नोव्हेंबर २०१९ व २१ ऑक्टोबर २०२२ रोजी कॅगने मुंबई महापालिकेच्या वेगवेगळ्या नऊ विभागांच्या खर्चाचे लेखापरीक्षण केले होते. त्यानंतर या खर्चामध्ये अनियमितता असल्याचे निरीक्षण कॅगने नोंदवले होते. एकूण ७६ प्रकल्पांमध्ये १२ हजार कोटी रुपयांची अनियमितता झाल्याच्या आरोपानंतर महाराष्ट्र सरकारनेच कॅगला चौकशी करण्याचा आदेश दिल होता. मुंबई महापालिकेवर केल्या जात असलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची एकूणच चौकशी व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने १९ जून रोजी विशेष तपास पथकाची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. त्यातून काय सत्य समोर येते हे पहावे लागेल. कॅगने मुंबई




महापालिकेच्या वेगवेगळ्या विभागांतील एकूण १२ हजार कोटी रुपये खर्चाची चौकशी केली होती. चौकशीनंतर सादर करण्यात आलेल्या अहवालामध्ये 'कॅगने १४ नोव्हेंबर २०२२ रोजी तपासणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, १७ नोव्हेंबर २०२२ रोजी मुंबई महापालिकेने कॅगला एक नोटीस पाठवली. या नोटिशीमध्ये कोविड काळात घेण्यात आलेले निर्णय, कामाचे पुढील ऑडिट करू नये', असे सांगण्यात आले होते. 'ही कामे एकूण ३,५३८ कोटी रुपायांची होती. ही नोटीस बजावताना साथरोग कायदा १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ या कायद्यांची मदत घेण्यात आली होती', असे कॅगने अहवालात म्हटले आहे. राज्य सरकारने दिलेल्या आदेशानुसार १३ जम्बो कोविड सेंटर, २४ वॉर्ड ऑफिसेस, ३० लहान व मोठी रुग्णालये यांचे ऑडिट करण्यात आले, असे कॅगने अहवालामध्ये नमूद केले आहे. १४६ पानांच्या या अहवालात मुंबई महापालिकेच्या अंतर्गत यंत्रणेत सुव्यवस्थेचा अभाव असल्याचे निरीक्षण कॅगने नोंदवले आहे. मुंबई महापालिकेकडून एकूण २० प्रकल्प कोणतीही निविदा न काढताच संबंधितांना देण्यात आले. त्याची अंतर्गत तपासणी आवश्यक आहे, असे कॅगने म्हटले आहे तसेच दुसऱ्या ४ हजार ७५५ कोटी रुपयांच्या ६४ कामांमध्ये कराराच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेली नाही. संबंधित कंत्राटदारांनी औपचारिक करार केलेला नसल्याने भविष्यात मुंबई महापालिका त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई करू शकणार नाही. अन्य तीन विभागांतील ३ हजार ३५५ कोटी रुपयांच्या १३ कामांमधील कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी कोणत्याही ऑडिटरची नियुक्ती करण्यात आलेली नाही, असे कॅगने आपल्या अहवालात म्हटले आहे. मुंबई महापालिकेच्या वेगवेगळ्या विभागांत आर्थिक अनियमितता असल्याचे कॅगने अहवालात म्हटले आहे. त्यानंतर ईडीने आता छापेमारी सुरू केली आहे. कॅगच्या अहवालानुसार विकास आराखडा विभागात भूसंपादनाचा खर्च वाढवून २०६ कोटी रुपये दाखवण्यात आला. जमिनीचा चुकीचा दर दाखवून भूसंपादन कायद्याचेही उल्लंघन झाल्याचे कॅगने म्हटले आहे. छापेमारीमागे कॅग हे कारण असले तरी मुंबई महापालिकेची निवडणूक असल्याने शिवसेनेच्या ठाकरे गटाला हिसका दाखवण्याचा हा सारा शिंदे-फडणवीस सरकारचा डाव आहे.तिथे ठाकरे गटाचीच सत्ता आहे.ठाकरे व भाजपा यांचे सूत जेव्हा जुळलेले होते,तेव्हा सर्वकाही डोळेझाकून चालले होते आता वितुष्ट आल्याने ठाकरे गटाचा वचपा काढाला जात आहे.कॅगचे असे शेकडोंनी अहवाल आलेले आहेत.कुणाचाही केसाला धक्का लागला नाही. राजकिय हेतू साध्य करण्यासाठी ईडीचे अस्त्र वापरले गेले आहे.विरोधकांची ही टीका अनाठायी म्हणताच येणार नाही.

## विदेश

# भारताला अमेरिकेचे पाठबळ

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याला खास पार्श्वभूमी आहे. गलवान खोऱ्यात भारतीय सैनिकांनी सन २०२० मध्ये जो भीमपराक्रम केला त्याचा तिसरा स्मृतिदिन येत आहे. जवानांची मर्दुमकी आणि यामुळे प्रकटलेली रणनीती अमेरिकेच्या पाठबळामुळे भविष्यात अधिक यशस्वी होईल, अशी चिन्हे आहेत. सन २०२०च्या १५ जूनला गलवान खोऱ्यात आपल्या शूर सैनिकांनी मल्लयुद्ध खेळून चाळीस चिन्यांना यमसदनी पाठवले. आपलेही वीस सैनिक हुतात्मा झाले.***

चिनी राज्यकर्त्यांनी या संघर्षापासून धसका घेऊन भारतविरोधी कारवाया वाढवल्या. सन २०२२च्या नऊ डिसेंबरला भारत-चीन सीमेवरती पूर्व दिशेला यांगत्से पठारावर भारतीय वीरांनी कुणाचाही बळी न देता सीमेचे संरक्षण केले. मधल्या काळात आपण अण्वस्त्रसज्ज झालो. प्रारंभी अग्नी एक हे क्षेपणास्त्र विकसित केले, त्याचा पल्ला बाराशे किलोमीटर्सचा होता. नव्या अग्नी सहाचा पल्ला १२ हजार किलोमीटर आहे. याच दशकांत आपण अंदमान निकोबारला भूदल, नौदल व वायुदल अशा तीनही दलांचे अण्वस्त्रसज्ज संरक्षण केंद्र उभे केले. मलाक्का सामुद्रधुनीच्या वायव्येस अंदमान बेट आहे व चीनला आवश्यक असलेल्या आयात वस्तू ज्या जहाजांमधून हिंदी महासागरातून दक्षिण चीन समुद्रात व पुढे चीनकडे कूच करतात त्यांना मलाक्का सामुद्रधुनी ओलांडावी लागते. आपण या संरक्षक केंद्रामुळे या जहाजांना मज्जाव करू शकतो. अरबी समुद्रात विक्रांत व विक्रमादित्य या विमानवाहू युद्धनौका गस्त घालत आहेत. जुन्या पराभवाचा बदला घ्यायचा हा निर्धार बाळगून आपली रणनीती सतत अत्याधुनिक होत आहे. तीन हजार ४८८ किलोमीटर लांबीची सीमा हिमालयीन क्षेत्रात चीनला भिडली आहे, पण साडेसात हजार किलोमीटर लांबीचा सागरी किनाराही जागरूक निगराणीची प्रतीक्षा करीत आहे. चीनला आसुरी महत्त्वाकांक्षेने झपाटले आहे. चौदा शेजारी देशांना वर्चस्वाखाली आणायचे व यासाठी भूपृष्ठीय व सागरी मार्गांची जाळी विणायची ही साम्राज्यवादी लालसा चीनला प्रेरणा देत आहे. तेव्हा आपण अखंड सावध असले पाहिजे.

गलवान खोऱ्यातील संघर्षामुळे चिनी आव्हान किती भीषण आहे याची जाणीव झाली. या संघर्षात आपण पाय रोवून उभे राहू शकलो कारण आपण



अमेरिकेकडून तातडीने अद्ययावत युद्धसाहित्य तसेच तंत्रविज्ञान व शत्रुपक्षाच्या हालचालींची ताजी माहिती मिळवू शकलो. या संघर्षाच्या निमित्ताने उणिवांचीही जाणीव झाली. उदाहरणार्थ, गलवानच्या खोऱ्याचे रक्षण केवळ १५ हजार सैनिकांवर आपण सोपवले होते. आता ते ५० हजारांनी वाढविले आहे. चोवीस तास टेहळणी करणाऱ्या सैनिकांच्या तुकड्या २०२० पूर्वी पाच होत्या, आता १७ आहेत. भारत-चीन सीमेवर सैनिक आणि युद्धवस्तू तातडीने पोहोचवण्याच्या उद्देशाने तीन वर्षांत रस्ते, पूल आणि बोगदे बांधण्यासाठी; या सर्वांची चोख डागडुजी करण्यासाठी ५४ प्रकल्प झाले. हवाई दल सुसज्ज राहण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांचा आकाशतीर प्रकल्प साकारत आहे.

अर्थात चीनचे सामर्थ्य भारताच्या कैकपट आहे. २०२० मध्येच रशिया-युक्रेन संघर्षात क्रायमियावर ताबा मिळवून रशियाही युक्रेनकडे वळला होता. रशिया, भारत विरुद्ध चीन या संघर्षात निष्पक्ष राहील ही समजूतही योग्य नाही. चीनजवळ ४१० आंतरखंडीय क्षेपणास्त्रे आहेत व आगामी दशकात ती एक हजार ९५० पर्यंत वाढू शकतात. रशियाने २०२२ पासून युक्रेनला अद्दल घडविण्यासाठी अचाट खटपटी चालविल्या आहेत. रशिया व चीन या दोघांचा समान शत्रू म्हणून अमेरिकेच्या विरोधात ही द्वयी कार्यरत होऊ शकते. या पार्श्वभूमीवर अमेरिका भारताला पाठबळ पुरविण्यास सज्ज झाली आहे. बराक ओबामा अध्यक्ष होते, तेव्हाच आखलेले आशिया पॅसिफिक क्षेत्रात वॉशिंग्टनने दिल्लीची पाठराखण करावी हे धोरण ट्रम्प यांनी इंडो-पॅसिफिक असे नामकरण करून मजबूत केले. वर्तमानात बायडेन यांनी चीनविरोधी ऑस्ट्रेलिया, जपान व भारत यांचा चतुष्कोनी आकृतिबंध उभा केला. याव्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया व ग्रेट ब्रिटन या दोन देशांच्या हातात हात घालून इंडो-पॅसिफिक क्षेत्रात लष्करी त्रिकोण साकारला.

अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवान मोदींच्या भेटीचा कसून गृहपाठ करीत आहेत. या जाणकाराने बायडेन यांच्यासह परराष्ट्र मंत्री, संरक्षण मंत्री आणि व्यापार मंत्री तसेच गुप्तहेर खात्याला विश्वासात घेऊन चौपदरी व्यूहरचना आखून सर्व पैलूंमधून भारतालाच लाभ व्हावा असे उद्दिष्ट ठेवले आहे. उदाहरणार्थ, युरोप खंडात रशियाला नियंत्रणात ठेवून युक्रेनला दिलासा देण्याची गरज आहे. याबाबत भारताची मर्यादा आहे, कारण आज तरी रशियाकडून मिळणाऱ्या शस्त्रास्त्रांवर भारत अवलंबून असल्याने भारताला युक्रेन प्रश्नावर स्वतःच्या हितसंबंधांची काळजी करू द्या. दुसरे क्षेत्र आहे अर्थकारणाचे. अमेरिकन अर्थव्यवस्थेचा औद्योगिक पायाच खिळखिळा झाला आहे, तेव्हा भारताशी व्यापार उदीम वाढवून अमेरिकन उद्योगांना मजबूत करा. सन १९७१ मध्ये अमेरिकेनेच कडेखांदी घेतलेला ची आज बूमरँग बनला आहे. त्याला आवरण्यासाठी भारताला अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरविले पाहिजे. चौथे, इंडो-पॅसिफिक क्षेत्रात वायव्य व ईशान्य आफ्रिकेतल्या सिएरा लिओन आणि इथिओपिया-सोमालियापासून दक्षिण चीन समुद्रात तैवानपर्यंत किंवा तैवानच्या सामुद्रधुनीपर्यंत चीनने मांडलेला उच्छाद संपवून भयग्रस्त राष्ट्रांना दिलासा देण्यासाठी ऑस्ट्रेलिया, जपानप्रमाणेच भारतही कळीची भूमिका बजावू शकतो. त्यासाठीच या तिन्ही देशांना पाणबुड्या, जेट लढाऊ विमाने, पायलटरहित विहार करू शकणारी स्वयंचलित विमाने वेळेवर पुरवा. तीन वर्षांत भारताला ३१ स्वयंचलित विमाने देण्यासाठी करार झाले आहेत. चीनच्या तुलनेने भारत सैन्यसंख्या, शस्त्रास्त्रे तसेच तंत्रज्ञानात पिछाडीवर आहे तरीही चीनशी झुंज घेत आहे. याचा अर्थ, भारतच चीनसाठी प्रभावी पर्याय आहे. या भारताशी मिलिटरी पॅक्ट' न करता मैत्रीचे सेतू बांधणे हे अमेरिकेसाठी हितावह आहे. मोदींची अमेरिका भेट सन २०१५ मध्ये पोप फ्रान्सिस आणि बराक ओबामा यांच्या हस्तांदोलनाची आठवण जागविणारी आहे.

**- प्रा. डॉ. अशोक मोडक**

## टुडेज् ब्लॉग

# विरोधकांना डोके आहे काय?

लोकशाही ही व्यवस्था आहे. ते एक पवित्र मंदिर आहे. मतदार हा त्याचा मालक आहे. त्याने लोकप्रतिनिधी नावाचे सेवेकरी नेमलेले आहेत. पंच्याहत्तर वर्षानंतर हे सेवेकरी आता वहिवाटदाराची भाषा करू लागलेले आहेत. आपणाला फक्त मंदिराच्या सेवेचा मान दिलेला होता. स्वातंत्र्य देवतेची सेवा करावयाची होती, आम जनतेच्या सुख सोयींसाठी, स्वास्थ्यासाठी तथा देशाच्या राष्ट्राच्या हितासाठी त्यांनी काम पहावे असे ठरलेले होते. या देशात असणाऱ्या सर्व धर्मांची, पंथाची, समुदायाची आणि समाजाची समानतेने सेवा करावी हे अपेक्षित होते.अशीच जबाबदारी त्याला दिलेली होती व आहे. मात्र हे सेवेकरी आता उद्दाम झालेले आहेत. गडगंज झालेले आहेत. यांची भाषा बदललेली आहे. जातीपातींमध्ये, धर्माधर्मामध्ये भेद निर्माण करण्याचे काम ही मंडळी करीत आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की ज्या कायद्याने यांना बंधन घालायची, त्यांच्यावर कारवाई करावयाची, ते सारे कायदे यांचे गुलाम झालेले आहेत. कायदे गुलाम झाले आहेत म्हणण्यापेक्षा, ते राबवणाऱ्या यंत्रणा निपचित पडलेल्या आहेत असेच म्हणावे लागेल.

लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन प्रकारचे सेवेकरी असतात. दोघांचीही जबाबदारी फार मोठी असते. सत्तेतील सेवक काही चुकत असतील, वागणुकीची दिशा बदलत असतील, देशाच्या सुरक्षिततेला समाजातील एकतेला यांच्या वागणुकीने बाधा येत असेल, तर त्याला अटकाव करण्याचे धोरण तथाकथित विरोधकांकडे असले पाहिजे. सत्ताधीशांना योग्य ती समज द्यायची असते, जबाबदारीची जाणीव करून द्यावयाची असते. या पद्धतीने दोघांनीही लोकशाहीच्या मंदिराची सेवा करावयाची असते, या मंदिराचे पावित्र्य राखायचे असते. असे सूत्र लोकशाहीत मांडण्यात आलेले आहे.

पण सध्या देशातील लोकशाहीच्या मंदिराची स्थिती पाहता तेथे वहीवाटदार मंडळींच दिसत आहेत. त्यांच्यातील आपापसातील भांडणे नजरेस पडत आहेत. ही भांडणे म्हणजे खानदानी मालमत्तेच्या भावकीतील भांडणासारखी नजरेस पडत आहेत. सत्ताधारी चुकत असेल तर त्याला बरोबर काय ते सांगणे, त्याने रस्ता बदलला असेल, तर त्याला योग्य रस्त्यावर आणणे आणि तो भरकटलेला दिसला तर त्याला वठणीवर आणणे हे काम विरोधकांच्या हातात असते. लोकशाहीतील विरोधी लोकप्रतिनिधी हे सगळे विसरून गेलेले आहेत. आता सत्ताधारी आणि विरोधक अशी वर्गवारी राहिलेली नाही. कधीकाळी ती होती. आता सत्तेत असलेले आणि सत्तेत नसलेले अशा दोन भागात ते विभागले गेले आहेत. ज्या राजकिय पक्षांच्या माध्यमातून देश चालवला जातो, ते सगळेच राजकिय पक्ष आज नाहीतर काल सत्ताधारी होते. त्यांनी सत्ता भोगलेली आहे, उपभोगलेली आहे त्यामुळे त्याचे फक्त आणि फक्त फायदे त्यांनी माहित करून घेतले आहेत. जबाबदारींचे ओझे आणि तोटे त्यांना नको आहे. आपल्या देशातील लोकशाहीतील अपेक्षित असलेली, विरोधी पक्षांची भूमिका, सध्या भरकटलेली आहे. नेमकी आपली कामे काय आहोत, आपली जबाबदारी काय आहे आणि आपण करायला काय हवे हवे आहे यात त्यांना स्वारस्य राहिले नाही. लोकशाहीची थट्टा सहन करत बसण्याशिवाय सामान्य जनतेच्या हातात काही नसते. ज्यावेळेस परिस्थिती सहनशिलतेच्या बाहेर जाईल, तेंव्हा उठाव करणे हेच आम जनतेच्या हातात असते. इतिहासाची पाने चाळले तर हे लक्षात घेतले पाहिजे.


स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षानंतर आपण नेमके कुठे आहोत? कसे आहोत? पुढील दिशा नेमकी काय असणार आहे? याबाबत सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये संभ्रम आहे. सर्वच राजकिय पक्षांची प्रमुख भूमिका ही आपापल्या राजकिय पक्षांचे अस्तित्व सांभाळणे, ते मोठे करणे आणि देशाची सूत्रे हाती ठेवणे एवढीच राहिलेली आहे. हे करीत असताना, नेतृत्व करणारी मंडळी आपले व्यक्तिगत स्तोम माजविण्यात अधिक सक्रिय आहेत. यात व्यक्तिगत स्तोम माजवणे आले आणि आपल्या कुटुंबाची दादागिरी चालवणे ही आले.कधीकाळी सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? असा प्रश्न विचारण्याची स्थिती तत्कालीन सत्ताधारी पक्षांनी आणि यंत्रणेने आणलेली होती. आज विरोधी पक्षाला असा प्रश्न विचारता येत नाही.

**- श्रीनिवास वैद्य**

## जन्म हा अखेरचा

# संतांची वाणी

माझी स्वतंत्रता तरी न मोडे । परी कर्माधीनु ऐसा आवडे । तेही भ्रांतिबुद्धि तरी घडे । एऱ्हवीं नाहीं ।।



माझ्या स्वातंत्र्याचा तर भंग होत नाहीच; पण मी कर्माधीन आहे असे जे लोकास वाटते, ते भ्रमामुळे वाटते; बाकी खरे पाहता तसे काही नाही.

कीं एकचि दिसे दुसरें । तें दर्पणाचेनि आधारें । एऱ्हवीं काय वस्तुविचारें । दुजें आहे? ।।

किंवा एकच वस्तू आरशासामोर ठेवली असता दोन ठिकाणी दिसते, पण वस्तुस्थितीचा विचार केला तर त्या दोन असतात का?

तैसा अमूर्तचि मी किरीटी । परी प्रकृति जैं अधिष्टीं । तैं साकारपणें नटनटीं । कार्यालागीं ।।

त्याचप्रमाणे, अर्जुना, मी तर निराकारच आहे, पण जगत्कार्यासाठी मायेचा स्वीकार करून नटाप्रमाणे बाह्यत: आकार धारण करितो.

जें धर्मजात आघवें । युगायुगीं म्यां रक्षावें । ऐसा ओघु हा स्वभावें । आद्यु असे ।।

धर्म म्हणून जेवढे आहेत त्यांचे मी युगायुगांचे ठायी रक्षण करावे असा क्रम अगदी मुळापासून चालत आलेला आहे.

म्हणौनि अजत्व परतें ठेवीं । मी अव्यक्तपणही नाठवीं । जे वेळीं धर्मातें अभिभवी । अधर्मु हा ।।

म्हणून ज्या ज्या वेळी अधर्माने धर्माचा नाश होतो, त्या त्या वेळी मी आपला जन्मरहितपणा बाजूला ठेवतो व निराकारपणाची आठवणही धरीत नाही.

ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें । मी साकारु होऊनि अवतरें । मग अज्ञानाचें आंधारें । गिळूनि घालीं ।।

त्या वेळी भक्ताच्या कैवाराने देह धारण करून अवतार घेतो आणि मग अज्ञानरूप अंधारास गिळून टाकितो.

अधर्माची अवधी तोडीं । दोषांचीं लिहिलीं फाडीं । सज्जनांकरवीं गुढी । सुखाची उभवीं ।।

अधर्माची मर्यादा तोडितो, दोषांनी केलेल्या सनदा फाडून टाकतो आणि जे साधु आहेत त्याजकडून सुखाचे ध्वज उभारतो.

## जनमानस

# आनंदाची पर्वणी - आषाढी एकादशी'

आषाढी आणि कार्तिकी एकादशी या दोन एकादशींना श्रीविष्णुचे तत्व पृथ्वीवर अधिक प्रमाणात कार्यरत असते.

आषाढी एकादशी म्हणलं की, डोळ्यासमोर येते ती पंढरपूरची वारी. वैयक्तीक जीवनातील अडचणी बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी.

महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून हरिनामाचा गजर करत लाखो वारकरी आषाढी वारीतून विठ्ठूरायाच्या दर्शनाला पंढरीला जातात.

प्रत्येकाचे हित जपणे, प्रत्येकाचे कल्याण करणे, सर्व जीवांमधे ईश्वर पहाणे, प्रत्येक कार्यात ईश्वराला सोबत घेणे,



धर्माला धरुन गृहस्थाश्रमाचे पालन करणे आणि भागवत धर्माचा मार्ग सूकर करणे हेच वारक-यांचे भक्तिमय जीवन असते.

संत ज्ञानेश्वरांनी 'वारी' हा शब्द फेरा किंवा खेप या अर्थाने वापरला आहे. वारी कधीपासून सुरु झाली हे निश्चितपणे खात्रीने सांगता येत नाही. संत ज्ञानेश्वरांनी वारीची महती अधिक वाढवली.

संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम या संतांनी वारीची परंपरा अधिक वृध्दींगत केली. तेव्हापासून आजपर्यंत वारीची परंपरा अखंड चालू आहे.

आषाढाचे दिवस हे पावसाचे दिवस असतात. शेतकरी शेतात पेरणी करुन वारीसाठी निघतो, तो माघारी येईपर्यंत पिक जोमाने वाढलेले असते. हे पिक तो वर्षभर वापरतो. त्याचप्रमाणे वारीतून मिळालेला आनंद व चैतन्य त्याला वर्षभर म्हणजे पुढील वारीपर्यंत पुरते.

**- भीमराव साळुंखे.**
सातारा.

# स्त्री-पुरुष समानता अद्याप दूरच!

***आज स्त्री-पुरुष समानतेचा नवा अध्याय लिहिण्याची चर्चा सुरू असताना, लहान मुलींवरील बलात्काराच्या बातम्या वाचून आणि ऐकून आपल्या मनात संतापाच्या लाटा उसळतात. बस, ट्रेन, सार्वजनिक ठिकाणी महिलांची चेष्टा करणे, त्यांचे कपडे, राहणीमान, बोलणे, शारिरीक रूप, रंग इत्यादींबद्दल असभ्य टिप्पण्या करणे, घरगुती महिलांच्या कामाचे अवमूल्यन करणे इत्यादी गोष्टी म्हणजे स्वतःच एक दुःखद आश्चर्य आहेत.खरे तर, खऱ्याअर्थाने स्त्री-पुरुष समानता संपूर्ण जगात अजून खूप दूरची गोष्ट आहे.संयुक्त राष्ट्रने महिला समानतेबाबत २०१७ ते २०२२ या कालावधीत जगभरातून गोळा केलेल्या आकडेवारीच्या आधारे असे म्हटले आहे की, दहापैकी नऊ जणांना महिलांबाबत भेदभाव वाटतो. पंचवीस टक्के पुरुषांना त्यांच्या पत्नीला मारहाण करण्यात काही नुकसान किंवा वाईट दिसत नाही.पन्नास टक्के लोकांचा असा विश्वास आहे की पुरुष चांगले राजकारणी आहेत.स्वतःला महिला समानतेचा नेता म्हणवणाऱ्या जर्मनीमध्ये, एका सर्वेक्षणातून असे समोर आले आहे की १०० पैकी ३३ पुरुष अधूनमधून महिलांवर हात उगारणे सामान्य मानतात. असं ते 'आपला सन्मान अबाधित राखण्यासाठी' करतात.***



भारतीय समाज आणि व्यवस्थेत महिलांच्या समानतेची आणि अधिकारांची चर्चा आजही वास्तविक संदर्भापासून दूर आहे. घटनेनुसार सर्वांना समान कायदेशीर अधिकार असूनही एका विशिष्ट मर्यादेनंतर या गोष्टी स्त्रीसाठी पुस्तकी बनतात.सामान्य घरांतल्या असो किंवा सुशिक्षित घरांतल्या वातावरणाबद्दल बोलायचे झाले तर जवळजवळ सर्व गृहिणींना पैसे कमावणाऱ्या कुटुंबातील पुरुषांकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ऐकावे लागते की 'तुम्ही माझी कमाई खातेस तेव्ह तुला मी सांगतो तसेच वागावे लागेल.' स्वत:च्या पायावर उभं राहून घर चालवणाऱ्या महिलांनाही वेळोवेळी अशा गोष्टींना सामोरे जावे लागते.घरातील किंवा नोकरदार महिलांचे हक्क असोत, विधवाविवाह असोत, वडिलांच्या मालमत्तेतील मुलींचे हक्क असोत, कामाच्या ठिकाणी समानता असो, हुंड्याची समस्या असो, लग्नाशी संबंधित रूढी-परंपरा असोत, प्रत्येक स्तरावर असमानता आहे. मोठी गोष्ट ही आहे की लोकांनी (बहुतेक स्त्रियांनीही) ही विषमता जीवनाची वस्तुस्थिती समजून स्वीकारली आहे. शतकानुशतके चालत आलेल्या परंपरांनी एक प्रकारे संविधान आणि कायद्याच्या गोष्टींना बगल दिली आहे.

अलीकडच्या काळात अनेक स्तरांवर महिलांबाबत मोठ्या वर्गात नकारात्मकतेची भावना वाढली आहे. हे लोकांच्या बोलण्यातून, वागण्यातून पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे. स्त्रियांना सूचित करण्यासाठी वापरली जाणारी पारंपारिक वाक्ये जसे- 'स्त्री आहेस, स्त्रीसारखं राहा', 'बांगड्या घालून बसा', 'स्त्री ही घराची इज्जत आहे' इत्यादी आजही जाहीरपणे बोलले जाते.स्त्रियांशी निगडीत शिव्या, नकारात्मक विनोद आणि स्त्रियांवर केलेल्या टिप्पण्या इत्यादी सर्वत्र ऐकायला आणि वापरल्या जाताना दिसतात. या सगळ्यातून समाजाची महिलांबाबतची दुटप्पी मानसिकता दिसून येते.उल्लेख करण्याजोगी गोष्ट ही आहे की, ज्या घरांतून आणि समाजातून मुली आणि स्त्रियांशी संबंधित प्रगती, समानता आणि सन्मानाची परिस्थिती दिसून येते, तिथेच वरील नकारात्मकता दिसून येते.त्याच घरांमध्ये आणि समाजात महिला आणि मुलींसोबत शारीरिक आणि मानसिक दुष्कृत्येही घडतात.अर्धनारीश्वर आणि शक्तिस्वरूपा दुर्गा या संकल्पना असलेल्या समाजात स्त्रियांना भोग, वस्तु आणि तुच्छतेच्या पातळीवर का टाकले जाते?स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या भारतीय समाजात घरापासून ते बाहेरपर्यंतची कोणतीही जागा तिच्यासाठी सुरक्षित का नाही?

आपल्या मुलांच्या हक्काबाबत आपण कसे जागरूक असतो, पण तिथे सून-मुलींचा प्रश्न येताच आपण कसे परंपरावादी बनतो, याचा विचार आपण केला पाहिजे. विशेष म्हणजे, भारतीय समाज कायदे आणि नियमाबरोबरच लहान-मोठ्या प्रथा आणि विधींनी चालतो.यातील काहींनी त्यांत सौंदर्य आणि रंग भरले आहेत, तर काहींनी अडथळा म्हणूनही काम केले आहे. याने एक बाजू सर्व शक्तीशाली आणि दुसरा वर्ग एक कठपुतळी बनवला आहे.घर-कुटुंब, समाज, चालीरीती, परंपरा या सर्वांनी मिळून स्त्रीविरोधी समाज घडवण्यात आपली भूमिका बजावली आहे. भ्रामक कथा तयार केल्या गेल्या आणि पुरुषांना सर्वशक्तिमान आणि स्त्रियांना गरीब, असहाय आणि गुलाम म्हणून चित्रित केले गेले. त्या सर्व गोष्टी अजूनही आपल्या समाज वातावरणात कमी-अधिक प्रमाणात जिवंत आहेत. समतावादी समाजाच्या निर्मितीसाठी या विचारावर आक्रमण करून समूळ नष्ट करणे आवश्यक आहे.स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात प्रत्येक घरापासून व्हायला हवी. मुलगा आणि मुलगी दोघांनाही समान हक्क आणि अधिकार आहेत. त्यामुळे बंधने आणि स्वातंत्र्यही दोघांसाठी समान असले पाहिजे. स्त्री समानता आणि सर्व स्तरांवर समानता ही एक उत्तम जग आणि उत्तम समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक अट आहे.

**- मच्छिंद्र ऐनापुरे,** जत जि. सांगली

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

**सोलापुरात पाण्याची ओरड कायमच!**

# ‘समांतर जलवाहिनी’ झाली तरी दररोज पाणीपुरवठा अशक्य

## मनपा प्रशासक शीतल तेली-उगले यांचे स्पष्टीकरण

सुराज्य/सोलापूर

उजनी - सोलापूर दुहेरी समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यावर सोलापूरचा पाणीप्रश्न मिटेल असे वाटत होते. मात्र हे काम झाल्यावरही शहराला दररोज पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचे स्मार्ट सिटीच्या सीईओ शितल तेली - उगले यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. मात्र अमृत २.० ही प्रस्तावित योजना पूर्ण झाल्यानंतर रोज पाणीपुरवठा करणे शक्य होईल, असेही त्या म्हणाल्या.

स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट योजनेअंतर्गत उजनी - सोलापूर समांतर जलवाहिनी १७० एमएलडी क्षमतेचे काम करण्यात येत आहे. ८९५ कोटी रुपयाचा हा प्रकल्प आहे. १ जून २०२३ रोजी पोचमपाड कंपनीस या कामाची वर्कऑर्डर दिली आहे. यासाठी स्मार्ट सिटी कडून २५० कोटी, एनटीपीसी कडून २५० कोटी, तर राज्य शासनाकडून ३९५ कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

या जलवाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे. १८ महिन्यात या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यात येणार आहे तर त्या पुढील तीन महिन्यात चाचणी व प्रात्यक्षिक करून ही जलवाहिनी कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे सीईओ शितल - तेली उगले यांनी सांगितले.

दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठा होणार का या प्रश्नाच्या उत्तरात सीईओ शितल तेली - उगले म्हणाल्या, सध्याची स्थिती पाहता स्मार्ट सिटी योजनेतून करण्यात आलेल्या एबीडी एरियात २४ तास पाणीपुरवठा करणे ही शक्य नाही. त्याचबरोबर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतरही शहराला दररोज पाणीपुरवठा करणे अशक्य आहे. सोलापूर शहराचे क्षेत्रफळ १७८ स्क्वेअर किलोमीटर आहे. समांतर विस्तार या शहराचा झाला आहे. सर्वत्र घरे विखुरलेले आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणात पाईप लाईन टाकण्याची गरज आहे.

तांत्रिक बाबी बघून दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतरही रोज पाणीपुरवठा करणे शक्य नाही. अमृत २.० या योजनेचा डीपीआर शासनाकडे पाठविण्यात येत आहे. साधारणता ५३२ कोटींची योजना आहे. या अंतर्गत शहरात पाणी टाकी उभारणे व इतर कामे मार्गी लावणे शक्य होणार आहे. ते पूर्ण झाल्यानंतर मात्र शहराला रोज पाणीपुरवठा करणे शक्य होईल.

### स्काडा प्रणालीचे काम जून अखेर पूर्ण होणार

पाण्याचे योग्य नियोजन करण्याच्या उद्देशाने पाणीपुरवठा नियोजन करण्यासाठी वॉटर ऑडिट करण्यात आलेले आहे. त्यानुसार स्काडा प्रणाली द्वारे संगणकीकृत पाणीपुरवठा वितरण व्यवस्था करण्यासाठी या प्रणालीचे काम सुरू आहे. ८० कोटी रुपये पर्यंत खर्च करण्यात आला आहे. स्काडा प्रणालीचे काम या जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. मानवी हस्तक्षेपाशिवाय पाणीपुरवठ्यातील सर्व डेटा उपलब्ध होणार आहे. यामुळे उपलब्ध पाणीसाठा आणि सोडण्यात आलेले पाणी अशी सर्व माहिती मिळू शकणार आहे, असे सीईओ तेली – उगले यांनी सांगितले.



## नागनाथ मंदिर येथे दीपोत्सव कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर

विजापुर रस्त्यावरील जागृत नागनाथ मंदीर येथे दिपोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी श्री.नागनाथ भक्तांच्या वतीने मंदीर ट्रस्टी कडे सुपूर्त झालेल्या ५१ मोठ्या समई च्या ज्योती प्रज्वलित करुन दिपोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला.श्री.नागनाथ मंदीर विश्वस्त समितीचे चेअरमन माजी आमदार शिवशरण आण्णा पाटील यांच्या हस्ते दीपोत्सवाचे उद्घाटन झाले.याप्रसंगी गुडडापुर देवस्थान समिती चेअरमन सिध्दव्या स्वामी,अनिल सिंदगी,रामदास फताटे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, सामाजिक कार्यकर्ते अशोक पाटील, ॲड.राजशेखर पाटील,मंदीरचे विश्वस्त विजयकुमार रामपूरे, शिवराया बुक्कानुरे, रामेश्वर माळगे उपस्थित होते. प्रारंभी पुजारी सिध्दव्या हिरेमठ स्वामी यांनी दिपोत्सव व मंदीर च्या सामाजिक कार्याची माहिती दिली. विरेश हिरेमठ व मल्लाव्या हिरेमठ स्वामी यांनी दीपोत्सवाची पुजा अर्चा केली.कार्यक्रमास शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे,रेवणसिध्द मैंदर्गी, सकलेश बाभूळगावकर,चंद्रकांत चोळके,आप्पू ख्याडे उपस्थित होते.शेवटी विश्वनाथ आमणे यांनी आभार मानले.

## माढ्यातील वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाचे आज उद्घाटन

सुराज्य/माढा

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर माढा या न्यायालयाचा उद्घाटन समारंभ मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा सोलापूरचे पालक न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण व शिवकुमार डिगे यांच्या हस्ते शनिवार दि. २४ जून रोजी सकाळी ११ वाजता उद्घाटन होणार आहे .

या उद्घाटन समारंभास जिल्हा प्रमुख न्यायाधीश मा डॉ. शब्बीर औटी, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य ॲड. मिलिंद थोबडे तसेच लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, माढा येथील आजी-माजी न्यायाधीश,सोलापूर जिल्ह्यातून सर्व बार असोसिएशनचे प्रतिनिधी, न्यायालयीन कर्मचारी या सर्वांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

अशी माहिती माढा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. आनंद कुलकर्णी यांनी दिली.पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष शंकर राजमाने सचिव रणजीत पाटील सहसचिव जयवंत सरवदे खजिनदार गणेश भुक्तर देशमुख, ग्रंथालय सचिव संध्या कुंभेजकर तसेच माजी अध्यक्ष ॲड. गणेश सावंत, ॲड. नवनाथ तांबीले, ॲड. गणेश त्रिंबके, ॲड. दयानंद पाटील, ॲड जगताप, ॲड. विजयकुमार आडकर, ॲड. पी एम पलसे, ॲड संचेती तसेच वकील संघातील वकील बंधू-भगिनी उपस्थित होते.




## सोलापूर सिंहगड विद्यार्थ्यांची स्किलॅथॉन २०२३ स्पर्धेत बाजी

सुराज्य/सोलापूर

केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थांनी जिल्हास्तरीय स्किलॅथॉन २०२३ स्पर्धेत मेकॅनिकल विभागामधील ऑइल लाईफ मॉनिटरिंग सिस्टीम फॉर इंजिन ऑइल ऑफ वेहिकल या प्रोजेक्टच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकविला.

उद्यम फाउंडेशन इन्कुबेशन सेंटर, कौशल्य विकास केंद्र, जिल्हा कौशल्य विकास, उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आणि जिल्हा व्यवसायिक शिक्षण तसेच प्रशिक्षण कार्यालयाच्या वतीने सोलापूर येथील नॉर्थकोट प्रशालेच्या परिसरात स्किलॅथॉन २०२३ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील राहुल बागलकोटी आकाश कोरे दयानंद माने आणि शकीब शेख यांना प्रथम पारितोषिक सोबत रोख रक्कम दहा हजार रुपये मिळाले.या प्रोजेक्टला मार्गदर्शक म्हणून प्रा. अविनाश लावणीस, प्रा. श्रीकांत जगताप, प्रा. सुमेध पाठक यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच रवी धर्मशाळे, आशुतोष अवसेकर, प्रसन्न जाधव , प्रसाद कलदिप, जय हिबारे, आदर्श म्हणता यांच्या 'हायड्रोलिक क्रेन' या प्रोजेक्टला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. यासाठी मार्गदर्शक म्हणून प्रा.कौस्तुभ मंगरूळकर आणि प्रा.शशिकांत लामकाने यांचे सहकार्य लाभले. या सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या प्रोजेक्ट गाईडचे डॉ.रवींद्र व्यवहारे, डॉ. शेखर जगदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले आणि सिंहगड संस्थेचे सहसचिव तथा सोलापूर सिंहगडचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले व तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## वर्षातून एकदाच द्यावा लागणार उत्पन्नाचा दाखला

सोलापूर : सामाजिक न्याय विभागाच्या विशेष सहाय्य योजनांतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांकडून दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर एप्रिल ते जून या कालावधीत उत्पन्नाचा दाखला घेण्यात येतो. मात्र, या योजनेतील ५० वर्षावरील लाभार्थ्यांच्या अडीअडचणी विचारात घेऊन उत्पन्नाचा दाखला दरवर्षी न घेता पाच वर्षातून एकदाचा घेण्यात यावा, असा शासन निर्णय झाला असून त्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनेतील ५० वर्षे त्यापुढील वयोगटातील लाभार्थ्यांसाठी उत्पन्नाचा दाखला दरवर्षी न घेता तो पाच वर्षांतून एकदा घेण्यास याद्वारे मान्यता देण्यात आली आहे यामुळे आता उत्पन्नाच्या दाखल्यासाठी दरवर्षी हेलपाटे मारण्याची आवश्यकता नाही.

## पाटील नगर येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : मजरेवाडी परिसरातील पाटील नगरात राहणाऱ्या शिवाजी राजू चौगुले (वय ३०) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली . शिवाजी चौगुले याने सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास घरातील छताच्या पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला . त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

## ‘सेतू’ पुन्हा सुरू होणार
## निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदार नेमण्यास मान्यता

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील ११ तालुकास्तरावरील सेतू सुविधा केंद्राची मुदतवाढ ता. ३१ मार्च रोजी संपुष्टात आणून जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्रे बंद करण्यात आले होते. जिल्हा सेतू समितीच्या सदस्यांनी मान्यता दिली असल्याने ता. १ एप्रिलपासून सर्व सेतू सुविधा केंद्र बंद आहेत. सेतू सुविधा केंद्र सुरु करण्यासाठी ई निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदार, अशासकीय संस्थेची नियुक्ती करण्यास जिल्हा सेतू समितीच्या सदस्यांनी मान्यता दिली आहे.

सध्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेशाकरिता विविध प्रमाणपत्र व दाखले यांची आवश्यकता असल्याने शहराच्या व तालुकाच्या मध्यवर्ती ठिकाणी सेतू सुविधा केंद्रे पूर्ववत सुरु करण्याची अनेक संघटना व राजकीय पक्षाकडून मागणी करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतू समिती सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करुन शहरासह जिल्ह्यातील सर्व तहसिलस्तरावरील सेतू सुविधा केंद्र सुरु करण्यात मान्यता देण्यात आली आहे.

## दीड महिन्यांच्या रजेनंतर शंभरकर रूजू
### आषाढीवारीच्या नियोजनात मग्न, पालखीचे केले स्वागत

सुराज्य/सोलापूर

सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर हे तब्बल दीड महिन्याच्या रजेनंतर २२ जून रोजी पुन्हा आपल्या पदावर रूजू झाले आहेत. रूजू झाल्यानंतर त्यांनी आषाढी वारी सोहळ्यात विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन आळंदी येथून निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे जाऊन पाहणी केली आणि पालखीचे स्वागत करून माऊलीच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.



जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर हे एक महिन्याच्या आयएएस प्रक्षिणासाठी साठी ६ मे रोजी मसूरीला रवाना झाले होते. २४ दिवसांचे प्रक्षिणासाठी कालावधी होता.

या कालावधित जिल्हाधिकारी पदाचा पदभार अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांच्याकडे देण्यात आला. २४ दिवसाच्या प्रक्षिणा नंतर शंभरकर हे आपल्या कौटुंबिक कारणासाठी रजा घेऊन परदेशी गेले होते.

या दीड महिन्याच्या दरम्यान नूतन जिल्हाधिकारी कार्यालयाचे उद्घाटन झाले. या उद्घाटन सोहळ्याला शंभरकर येणार अशी चर्चा होती मात्र त्यांना येता आले नाही. जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातून आता संपूर्ण कामकाज हे नवीन जिल्हाधिकारी कार्यालय सुरू झाले आहे. मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी थेट पंढरपुरात येऊन पदभार घेतला आणि आषाढीवारीच्या पालखी स्वागताच्या स्थळाची पाहणी करत आढवा घेताला शुक्रवारी प्रशासनाच्या वतीने स्वागत केले. तब्बल दिड महिन्याच्या कालाविधीत तुषार ठोंबरे यांनी जिल्हाधिकारी पदाचा पदभार संभाळला.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
विभागीय कार्यालय क्र.०२, राजेंद्र चौक

जा.क्र. /वि.का.२ दि.२३/०६/२०२३

**जाहिर प्रसिद्धीकरण मसुदा**

सोलापूर महानगरपालिकेकडील विभागीय कार्यालय क्र.०२ विद्युत विभागकडे मुख्य कार्यालय विद्युत विभागकडील सन २०२३-२४ पोल शिफ्टींग करणे - र.रू.२०.०० लाख या बजेट अंतर्गत सर्व्हे नं.२७/२ब/२ हैद्राबाद जकात नाका येथील पोल शिफ्ट करणे काम मनपा संकेतस्थळावर १ ले वेळेस अल्प मुदतीचे निविदा प्रसिद्धीकरण करणेत येत आहे.

या कामाचे निविदा www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर दर्शविणेत येत आहे.

**संकेतस्थळ निविदा अ.क्र. - ८९९४.**

सही/-
विभागीय अधिकारी
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर**
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 (मोहोळ) सोलापूर**

दूरध्वनी क्रमांक -0217-2720545 Email ID - dycollectorslao007@ gmail.com

क्र.2023/उभूसक्र 7/मोहोळ/संकीर्ण.1/कावि-329 दिनांक -14/06/2023

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.९ मंगळवेढा** यांचेकडील मौजे पाटकूल, तालुका- मोहोळ,जि. सोलापूर येथील **प्रयोजन-आष्टी उपसा सिंचन योजना, उजवा कालवा कि.मी. २१ ते २८** या कामासाठी भूसंपादन करणेसाठी सोबत जोडलेल्या अनुसुचीमध्ये नमूद एकूण क्षेत्र २५ हे ८५ आर जमिन महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. संकीर्ण -०३/२०१५ प्र. क्र.३४/अ-२ दि. १२/०५/२०१७ व संकीर्ण ०३/२०१५ प्र.क्र.३४/अ-२ दि. ३०/०९/२०१५ प्रमाणे व परिपत्रक क्र.एलक्युएन १/२०१७ प्र.क्र.१२/अ-२ दि.२५/१/२०१७ मध्ये खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणे प्रस्तावित आहे.

सदरबाबत जमिनीतील हक्क, कुळ, टाच, हितसंबंध व वारस इत्यादीबाबत हरकत/तक्रार असल्यास वा जमिनीच्या खरेदीदराच्या अनुषंगाने म्हणणे मांडावयाचे असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत समक्ष अथवा रजिस्टर्ड पोष्टाने कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते सायं ५.४५.वाजेपर्यंत) पोहोचेल अशा रितीने उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ७ (मोहोळ) सोलापूर यांचे कार्यालयाकडे लेखी म्हणणे / हरकत सादर करावी. अन्यथा खालील अनुसुचीत स्तंभ ३ मध्ये नमूद जमीन स्तंभ २ मध्ये नमूद जमीन मालकाची निर्वेध व निजोखमी मिळकत असल्याचे समजण्यात येईल. दिलेल्या मुदतीनंतर कोणतीही हरकत आल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही.

**सोबत :- अनुसूची**
**दिनांक :- १४/०६/२०२३**
**स्थळ :- सोलापूर**

सही/-
(श्रावण क्षिरसागर)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
क्र.७ (मोहोळ) सोलापूर

**अनुसूची**
**संपादन संस्थेचे नाव :- कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.९ मंगळवेढा**
**भूसंपादनाचे प्रयोजन :- आष्टी उपसा सिंचन योजना, उजवा कालवा कि.मी. २१ ते २८**

| अ. क्र. | भूधारकाचे नांव | गट नंबर/ सर्व्हे नंबर | भूधारणा पद्धती | गाव नमुना नं. ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे. आर.) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | रामा विठोबा महार व इतर | १४१ | भोगवटादार वर्ग-२ | ७.७५ | ०.१६९ |
| २ | पांडूरंग भगवान ऐवळे, हरिदास भगवान ऐवळे, रामचंद्र यल्लाप्पा ऐवळे, शिवाजी लक्ष्मण ऐवळे, व इतर, दगडू दत्तात्रय लोंढे, रेखा रघुनाथ लोंढे, बाळासाहेब विठ्ठल ऐवळे व इतर, रणजित महिबूब लोंढे, विनायक भगवान लोंढे, विनायक भगवान लोंढे | १४२ | भोगवटादार वर्ग-२ | १२.२८ | २.१६० |
| ३ | शिवाजी साहेबराव लोंढे व इतर सूर्याजी महबूब लोंढे, बाळासाहेब विठ्ठल ऐवळे व इतर, रेखा रघुनाथ लोंढे, नंदा विष्णू लोंढे, दगडू दत्तात्रय लोंढे व इतर, शिवाजी लक्ष्मण ऐवळे व इतर रामचंद्र वल्लाप्पा ऐवळे, पांडुरंग भगवान ऐवळे, हरीदास भगवान ऐवळे | १४३ | भोगवटादार वर्ग-२ | १२.१४ | ०.३८० |
| ४ | शिवाजी लक्ष्मण ऐवळे व इतर रामचंद्र यल्लाप्पा ऐवळे, पांडुरंग भगवान ऐवळे, हरीदास भगवान ऐवळे, रघुनाथ सिताराम लोंढे, दगडू दत्तात्रय लोंढे, बाळासाहेब विठ्ठल ऐवळे व इतर, महिबूब यल्लाप्पा लोंढे, शिवाजी साहेबराव लोंढे व इतर | १२६ | भोगवटादार वर्ग-२ | ९.३७ | १.०५० |
| ५ | अर्जुन कृष्ण कोळी, दत्तात्रय कृष्णा कोळी | १२४ | भोगवटादार वर्ग-२ | ९.४५ | १.१८० |
| ६ | दगडू कृष्णा कोळी, धोंडीबा कृष्णा कोळी, भिकाजी कृष्णा कोळी, अर्जुन कृष्णा कोळी | १२३ | भोगवटादार वर्ग-२ | ११.५४ | ०.३३० |
| ७ | मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर, सुरेखा टोपा कांबळे | १२७ | भोगवटादार वर्ग-२ | ११.५४ | १.१५० |
| ८ | सरकार | १२२ | भोगवटादार वर्ग-२ | ४.०५ | ०.५५० |
| ९ | अशोक दत्तात्रय लोखंडे व इतर | १२१ | भोगवटादार वर्ग-२ | ९.८७ | १.३९० |
| १० | कांतीलाल लक्ष्मण लोखंडे व इतर, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सोलापूर मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर, रुपालीसंजय आदलिंगे व इतर, लक्ष्मण सावता वसेकर, संतोष सावता वसेकर | ११५ | भोगवटादार वर्ग-१ | १६.३९ | १.४०० |
| ११ | आप्पाराव मछिंद्र काळे, संगिता सुरेश वसेकर | ११४ | भोगवटादार वर्ग-१ | ४.२४ | ०.३०० |
| १२ | विजय श्रीमंत वसेकर, संजय औदुंबर वसेकर, श्रीमंत वसुदेव वसेकर, दिलीप दिगंबर वसेकर व इतर, अरुण नारायण वसेकर, विजय श्रीमंत वसेकर व इतर | १०६ | भोगवटादार वर्ग-१ | १४.९१ | २.०४० |
| १३ | जिल्हा परीषद गावतळे, कोंडीबा सोपान राऊत, गोपाळ सोपान राऊत, नारायण गोपाळ राऊत व इतर | १०७ | भोगवटादार वर्ग-१ | ४.८६ | ०.३७० |
| १४ | शुभांगी चंद्रकांत मस्के व इतर | १०२ | भोगवटादार वर्ग-२ | ९.६० | १.५४० |
| १५ | शुभांगी चंद्रकांत मस्के व इतर | १०३ | भोगवटादार वर्ग-२ | ७.८२ | ०.३०० |
| १६ | महादेव नरहर काळे व इतर | ९६ | भोगवटादार वर्ग-१ | २३.८७ | २.५८० |
| १७ | कृष्णाजी मारुती सूर्यवंशी | ९५ | भोगवटादार वर्ग-२ | ३.७७ | ०.२१० |
| १८ | अविनाश अरुण मोहोळे, विजयकुमार भगवान मोहोळे, उज्वला अनिरुध्द मोहोळे, विजयकुमार भगवान मोहोळे, उज्वला अनिरुध्द मोहोळे | ६१ | भोगवटादार वर्ग-१ | ९.२९ | १.४७० |
| १९ | धनाजी दत्तात्रय काळे व इतर, मधुकर शिवराम काळे व इतर, दत्तात्रय शिवराम काळे, बाहुबली बाळासाहेब महाजन, शितलकुमार बाळसाहेब महाजन, प्रकाश बाळासाहेब महाजन | ६२ | भोगवटादार वर्ग-१ | १४.७५ | ०.६६० |
| २० | न्यु विन्टेज टिशुटेक प्रायव्हेट लि., मे.ग्रीन स्प्रिंग अग्रीटेक लि. व इतर मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सोलापूर | ५९ | भोगवटादार वर्ग-१ | १५.८७ | १.९०० |
| २१ | मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर, राजाराम देविदास कोडलिंगे, जब्बार अब्दुल मुलाणी व इतर, लैला वजीर मुलाणी, अब्दुल हनिफ मुलाणी, जब्बार अब्दुल मुलाणी, सचिन वसंत गावडे, गफार अब्दुल मुलाणी, नितीन वसंत गावडे, नितीन वसंत गावडे | ५८ | भोगवटादार वर्ग-१ | ११.३२ | १.२६० |
| २२ | उस्मान माणिक आतार व इतर, नितीन वसंत गावडे, नितीन वसंत गावडे, संतोष रघुनाथ गोडाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सोलापूर | ५७ | भोगवटादार वर्ग-१ | १५.७५ | १.४८० |
| २३ | केशव पांडुरंग पांढरे व इतर, सुवर्णा केशव पांढरे, सुधाकर सदाशिव निलकंठ व इतर | ६० | भोगवटादार वर्ग-१ | १३.५२ | ०.८५० |
| २४ | मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर, कांतीलाल लक्ष्मण लोखंडे व इतर | ११७ | भोगवटादार वर्ग-१ | ४.६७ | ०.९६० |
| २५ | आप्पाराव मच्छिंद्र काळे, संगीता सुरेश वसेकर | ११४ | भोगवटादार वर्ग-१ | ४.२४ | ०.१७० |
| | **एकुण क्षेत्र हे. आर.** | | | | **२५.८५** |

**दिनांक :- १४/०६/२०२३**
**स्थळ :- सोलापूर**
**जिमाका/सो/जाहि/६२/२०२३-२४**


शिक्का

सही/-
(श्रावण क्षिरसागर)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
क्र.७ (मोहोळ) सोलापूर

# दूध भेसळ करणाऱ्यांवर मोक्कांतर्गत कारवाई करण्याचे आदेश : विखे- पाटील

✔ सुराज्य/अकलूज

**दूध भेसळ प्रकरणामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे त्यामुळे या भेसळ करणाऱ्यावर मोक्कातंर्गत कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर ज्या संस्थांना हे भेसळ दूध जाते त्या संस्थावरही कारवाई करण्यात येईल.महान संतांच्या पालख्यांचे स्वागत करण्याचे भाग्य मला लाभले त्यामुळे मी धन्य झालो आहे असेही मत सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल व पशू संवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले.**




अकलूज येथील शिवरत्न बंगला येथे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांची स्नेह भेट घेण्यासाठी ते आले असता बोलत होते.

यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, जवळपास २५ लाख भाविक पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत असतात. सोलापूर जिल्ह्यात या सर्व पालख्यां स्वागत करताना मनापासून आनंद होत आहे. पालखी मार्गावरील रखडलेले प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. वारकरी बांधवांच्या सुख सुविधेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून विना अडथळा पालखी वारी पार पडेल. पाणी, आरोग्य आणि स्वच्छता या विषयावर भर देण्यात आला असून प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे.

याप्रसंगी डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांची पुण्यतिथी अभिवादन करून साजरी करण्यात आली.

याप्रसंगी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आ. राम सातपुते, भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार जयकुमार गोरे, संघटन महामंत्री पश्चिम महाराष्ट्र मकरंद देशपांडे, शशिकांत चव्हाण,रविकांत पाटील, भारतनाना पाटील, उपसभापती मामासाहेब पांढरे आदी मान्यवर उपस्थित होते.



## अन्नछत्र उत्तमरित्या चालवीत असल्याने विकासाची घोडदौड: पटोले

✔ **अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले हे न्यास उत्तमरित्या चालवीत असल्याने विकासाची घोडदौड पाहायला मिळत असल्याचे मनोगत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी व्यक्त केले.

ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत माजी गृह राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, ताईसाहेब पटोले, प्रियांका पटोले, राहुल पटोले, शीतलताई म्हेत्रे, प्रथमेश म्हेत्रे, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रईस टीनवाला, अशपाक बळोरगी, लाला राठोड, सद्दाम शेरीकर, काकासाहेब कुलकर्णी, भीमाशंकर जमादार, विजयकुमार हत्तुरे, आनंदराव सोनकांबळे, सुधीर लांडे, अभिराज शिंदे, भीमराव बाळगे, रमेश हसापुरे, चांद आळंद, शिवू स्वामी, संजय विभूते, विश्वनाथ हडलगी, शिवशरण इचगे, बाबा पाटील, फारुख बबरची, अशपाक अग्सापुरे, विनीत पाटील, शादिद वळसंगकर, लखन तांबोळी, रामचंद्र समाणे, रवी वरनाळे, हाजीम अत्तार, दिरज पाटील, सिध्दार्थ गायकवाड, मैनुद्दिन कोरबू, मुबारक कोरबू, सिध्दाराम भंडारकवठे, सरू शेख, महिबूब फरास, नंदू स्वामी हे उपस्थित होते.

## एकात्मा संस्थेतर्फे शालेय साहित्य वाटप

✔ **सोलापूर** : छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून गुरुवार २२ रोजी सुंदराबाई डागा मराठी मुलांची शाळा, सोलापूर येथे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना एकात्मा बहुद्देशीय संस्थेच्यावतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

प्रमुख पाहुणे माऊली पवार, समन्वयक मराठा समाज सोलापूर जिल्हा, उद्योजक अहदभाई शेख, ऋषीकेश माळशिखरे यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक नागेश गोसावी, शिक्षक धीरज कुचेकर, राजू क्षीरसागर, कावेरी पवार, गिरीष कुरंडे, मनोज पाटील आदी उपस्थित होते. यावेळी १४२ शालेय विद्यार्थ्यांना शालेय वाटप करण्यात आलो. यावेळी एकात्म बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक सचिन शिराळकर यांनी प्रत्येक वर्षी शाळेतील विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले. यावेळी संस्थेचे बाळासाहेब दुपारगुडे, दिगंबर सर्वगोड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## रेल्वेतर्फे समपार फाटक जागरुक दिन

✔ **सोलापूर** : मध्य रेल सुरक्षा अधिकारी सोलापूर मंडलच्यावतीने समपार फाटक जागृत दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. तिलाठी स्टेशन गट क्र. ६१, ४७७/२९ कि. मी. या ठिकाणी नुक्कड, पथनाट्य सादर करण्यात आले. सूत्रसंचालन अशोक कंपली यांनी केले तर गेटमन श्रीराम शिवराम हुर्लेकर यांनी पथनाट्य सादर केले. गेटवर गाडी घेऊन थांबलेले कर्मचारी व नागरिकांनी कार्यक्रमाला दाद दिली. या नाटकामध्ये श्रीराम हुर्लेकर, अशोक कंपली, विजय बोराडे, सुभाष गुराखे, मिलिंद मुळे, निर्मला हुलेकर, उमेश साळवे, राहुल माने, मध्य रेल सांस्कृतिक अकादमीचे नाट्य कलाकार आदी उपस्थित होते. डीटीसी या ठिकाणी निरजकुमार दोहरे, रेल प्रबंधक व वरिष्ठ सुरक्षा अधिकारी शिवाजी कदम, सहा. सुरक्षा अधिकारी होटी लाल मीना, एस. पी. पीठा, रघुनाथ नायर, टी. आय. कौन्सलर, ताजोद्दीन शेख, अस्लम शेख, ऋषी स्वामी, सौरव हुलेकर, रोहन साठे, आदित्य माने, शुभम चांगभले हे होते. यावेळी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. सूत्रसंचालन अशोक कंपली यांनी केले. आभार श्रीराम हुलेकर यांनी 'गाडी बुला रही है, सिटी बजा रही है', हे गायन सादर करुन कार्यक्रमाचा समारोप झाला.

## गुन्हे शाखेकडून दुचाकी चोरी,घरफोडी केल्याप्रकरणी दोघांना अटक;

✔ **सोलापूर** : दुचाकी चोरी व घरफोडी केल्याप्रकरणी दोघांना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. बंडू मधुकर पवार ऊर्फ बंड्या (वय २२, रा. ढोक बाभळगाव, मोहोळ) व बिच्च्या ऊर्फ विशाल गोटूराम काळे (वय १९, रा. चंदननगर, लांबोटी, मोहोळ, सध्या, धाराशिव) या दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीतील ५ मोटारसायकली, मोबाइल व घरफोडीतील २ लाख ३१ हजारांचे ऐवज जप्त करण्यात आले आहे.दोन्ही आरोपींकडून चोरीतील ५ मोटारसायकली, ५ घरफोडीच्या गुन्ह्यातील ३२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, २२ ग्रॅम चांदीचे दागिने, २ मोबाइल हस्तगत करण्यात आले आहे. अशाप्रकारे एकूण १० गुन्हे उघडकीस आले आहेत.गुन्हे शाखेकडील स.पो.नि. संदीप पाटील व त्यांच्या पथकातील सदस्य हे विविध गुन्ह्यातील गुन्हेगारांचा शोध घेत असताना आरोपी बंडू पवार हा आपल्या साथीदारासोबत जुना कारंबा नाका येथील पांढरे वस्तीकडे जाणाऱ्या रोडवर थांबल्याची माहिती मिळाली. याची खात्री करून पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केल्यानंतर आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून एकूण २ लाख ३१ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, अंमलदार दीपक किर्दक, विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, सुभाष मुंढे, अर्चना स्वामी, सुमित्रा बोरबोले, प्रकाश गायकवाड, वसीम शेख, प्रवीण शेळकंदे, सतीश काटे, बाबासाहेब काळे यांनी केली.

## डॉ.रमेश अग्रवाल यांचे निधन



✔ **सोलापूर** : राईस किंग अग्रवाल बंधू यांच्या अग्रवाल नर्सिंग होम चे संचालक डॉ.रमेश ईश्वरदास अग्रवाल यांचे निधन झाले. दुपारी मोदी स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. ते ६७ वर्षांचे होते. डॉ. सौरभ अग्रवाल यांचे ते पिता होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा दोन मुली त्या दोन्हीही डॉक्टर आहेत. आई चार बहिणी आणि दोन भाऊ असा मोठा परिवार आहे.

## सराईत गुन्हेगार संतोष कांबळे स्थानबध्द

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील फौजदार चावडी, जेल रोड, एमआयडीसी, विजापूर नाका आणि सदर बझार पोलीस ठाणे हद्दीतील सराईत गुन्हेगार संतोष संजय कांबळे ( वय २९, रा. आडवा नळ झोपडपट्टी, जय मल्हार चौक) याला एमपीडीए अंतर्गत स्थानबध्द करण्यात आले आहे. त्याच्यावर शस्त्राचा वापर करून जबरी घरफोडी, सायकल चोरी, खंडणी, खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा घालण्याची पूर्वतयारी करणे असे विविध १६ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

संतोष कांबळे याला गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी यापूर्वीही २०१९ मध्ये एमपीडीए कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आलेली होती. त्यानंतरही संतोष कांबळे याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही. त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा होईल असे गुन्हेगारी कृत्य सूरूच होते. त्यामुळे त्याचे गुन्हेगारी कृत्यास वेळी प्रतिबंध करण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी २० जून रोजी त्याचे विरुध्द एमपीडीए अधिनियम १९८१ कलम ३ अन्वये स्थानबध्दतेचे आदेश काढले. त्यास २१ जून रोजी येरवडा कारागृह, पुणे येथे दाखल करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, डॉ. संतोष गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे सुनील दोरगे, वपोनि राजन माने, पोनि शिवशंकर बोंदर, पोउपनि विशेद्रसिंग बायस व एमपीडीए पथकातील अंमलदार पोहेकॉ विनायक संगमवार, पोहेकॉ सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

## भारती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत सुयश

✔ सुराज्य/सोलापूर

मार्च-२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी. परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून भारती विद्यापीठ माध्यमिक विद्यालय व जुनिअर कॉलेज सोलापूरचा निकाल ९८.६० टक्के लागला आहे. कु. अक्षता अमोल शिरढोणे हिने ९%.०० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम, कु. समीक्षा मोहन सावंत हिने ९५.६० टक्के मिळवून व्दितीय तर चि. निरंजन धनंजय नकाते याने ९५.२० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. विद्यालयातील एस.एस. सी. परीक्षा मार्च-२०२३ साठी २५० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ८६ विद्यार्थी उच्च श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना त्यांना शिकवणारे शिक्षक, पालक, विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. जी.एम. कुलकर्णी तसेच मुख्याध्यापक श्री. एम.बी. महामुनी यांनी मार्गदर्शन केले.



## पुणे परिमंडळ येथील महापारेषण कंपनीचा वर्धापन दिनी पुरस्कार वितरण

✔ सुराज्य/सोलापूर

महापारेषण कंपनीच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे परिमंडळात दि.२१ रोजी प्रा. रामकृष्ण मोरे सभागृह पिंपरी चिंचवड येथे क्षेत्रीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

या सोहळ्याला महापारेषण कंपनीचे संचालक संदीप कलंत्री प्रमुख अतिथी म्हणून तर मुख्य महाव्यवस्थापक सुधीर वानखेडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, महेश आंबेकर, विशेष अतिथी म्हणून तसेच महापारेषण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र गायकवाड अध्यक्ष म्हणून लाभले होते. महावितरण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार प्रमुख पाहुणे होते.

यावेळी पुणे परिमंडळातील अधीक्षक अभियंता जयंत कुलकर्णी, प्रकाश कुरसंगे, सतीश गायकवाड, प्रमोद भोसले, राम शेळके, तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक प्रशांत चौधरी, मिलिंद घोलप, सहा मुख्य दक्षता अधिकारी सुभाष भिलारे, यांच्यासह पुणे परिमंडलातील अनेक अधिकारी, कर्मचारी, संघटना प्रतिनिधी, कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय इ. मोठ्या संखेने उपस्थित होते.प्रज्ञा जोशी, सहा. अभियंता यांच्या पुष्पांजलीने रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. हास्य सम्राट दीपक देशपांडे यांचा हास्यकल्लोळ हा एकपात्री प्रयोग सादर झाला. यावेळी क्षेत्रीय पुरस्कारांचे वितरण झाले यामध्ये २२० केव्ही मगरपट्टा सब स्टेशन, २२० केव्ही थेऊर सबस्टेशन , १३२ केव्ही सांगोला सब स्टेशन, १३२ केव्ही सणसवाडी सब स्टेशन तसेच लाईन मेंटेनन्स सबडिव्हिजन पुणे, बारामती तसेच ईएचव्ही प्रोजेक्ट सब डिव्हीजन पुणे , ईएचव्ही लाईन प्रोजेक्ट सब डिव्हीजन पंढरपूर , ४०० केव्ही लाईन प्रोजेक्ट सब डिव्हीजन हिंजवडी, ईएचव्ही लाईन प्रोजेक्ट सब डिव्हीजन बारामती या विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. *यासोबतच टेस्टिंग टीम, सिव्हिल टीम, हॉटलाइन टीम , पीआयडी टीम व ड्ख युनिट यांचाही गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन मेघा पांडे व कीर्ती सानप उप कार्यकारी अभियंता यांनी केले. कार्यकारी अभियंता वर्षा बोरकर यांनी आभार व्यक्त केले.

## बेकायदा वाळू ,मुरूम उपसा करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

सहाय्यक जिल्हाधिकारी आव्हाळे यांचे आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर जिल्ह्यामध्ये वाळू आणि मुरूमचा बेकायदा उत्खनन करून वाहतूक करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. वाळूची चोरीची मोठ्या प्रमाणात होत असल्याने शासनाचा मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे अशा चोरीच्या ठिकाणी धाडी यालून जप्तीसह फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिले आहेत.

सध्या शहर आणि जिल्ह्यामध्ये वाळूचा बेकायदा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शासनाच्या ६०० रुपये प्रतिब्रास वाळूच्या निर्णयाची अमंलबजावणी केली जाणार आहे. पाच वाळू याटाचा वाळू उपशाचा लिलाव झाला आहे. पाच वाळू याटाचा मक्ता एकाच मक्तेदारांला दिला जाणार आहे. त्यामुळे बेकायदा वाळू आणि मुरूम उपसा आणि वाहतूकीस आळा घातला जाणार आहे. त्यासाठी गुरुवारी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा विभागीय अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या दालनात बैठक झाली.या बैठकीत बेकायदा वाळू आणि मुरूम उपसामुळे पर्यावरण ,वन विभाग तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या , हरित लवादाच्या निकषाचे निर्णयाचे पालन केले जात नाही. अवैध उत्खनामुळे पर्यावरणाचा रास होत आहे. परिणामी शासनाच्या महसुलामध्ये मोठे नुकसान होत आहे. हे नुकसान टाळण्यासाठी तहसिलदार आणि मंडलअधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे आदेश या बैठकीत देण्यात आले आहेत.बेकायदा उपसा आणि चोरीच्या ठिकाणी धाडी लाण्यासाठी मंडल अधिकारी, तलाठी, पोलिस पाटील यांची संयुक्त स्थिर पथके तर विशेष भरारी पथक तैनात करण्याचे सहाय्यक आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले आहेत.

## शिरवळ येथील शेतातील १२ झाडांची कत्तल; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर




दुसऱ्याच्या शेतातील १२ झाडांची कत्तल करून दोन लिंबाचे झाडे चोरून नेल्याची घटना शिरवळ (ता. अक्कलकोट) येथे १८ जून रोजी घडली . या प्रकरणात अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी चौघां जणाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे .

या संदर्भात राम शंकर सुरवसे (वय २८ रा.शिरवळ ) या शेतकऱ्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली . त्याप्रमाणे पोलिसांनी चंद्रकांत ढाले, गजानन सुरवसे, रामजी सोनके आणि लक्ष्मण जगताप (सर्व रा. शिरवळ) या चौघा विरुद्ध गुन्हा दाखल केला . या सर्वांनी मिळून १८ जून रोजी सकाळी सुरवसे यांच्या शेतातील लिंब, बाभळ आणि खैराचे असे एकूण १२ झाडे तोडले . त्यानंतर दोन लिंबाचे झाडाचे बुड चोरून चोरून नेले. या चोरीस नेलेल्या बुडाची किंमत १२ हजार इतकी असल्याची तक्रार सुरवसे यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार गीते करीत आहे .

## पॅशन प्लस मोटारसायकलचे चव्हाण ऑटोमोबाइल्समध्ये अनावरण

✔ सुराज्य/सोलापूर




भारतातील सर्वात प्रसिद्ध आणि दुचाकी वाहनांची सर्वात मोठी उत्पादक असलेल्या हिरो कंपनीने नुकतेच न्यू पॅशन प्लस ही ग्राहकांची आवडती मोटारसायकल बाजारात आणली आहे. या गाडीचा अनावरण सोहळा चव्हाण ऑटोमोबाइल्स मध्ये आ. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला.

आपल्या ग्राहकांच्या आधुनिक आणि आवश्यक गरजेनुसार हिरो कंपनीने ही न्यू पॅशन प्लस मोटारसायकल अधिक आकर्षक स्टाईल मध्ये आणि ३ आकर्षक रंगात आणली आहे. या सोबत या गाडीमध्ये साईड स्टॅन्ड इंजिन कटअप, मोबाईल चार्जर, लॉन्ग सीट, शक्तिशाली १०० सी सी इड-६ इंजिन दिले आहे. या गाडीची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे शून्य मेंटेनन्स, कमीत कमी किंमत आणि जास्तीत जास्त मायलेज ही आहेत. या अनावरण सोहळ्यामध्ये आ. प्रणिती ताई शिंदे यांच्या हस्ते २१ ग्राहकांना नवीन गाडीची डिलिव्हरी देण्यात आली. या वेळी बोलताना आ. प्रणिती ताई शिंदे यांनी गाडी कमी वेगाने आणि सर्व नियम पाळून जबाबदारीने चालवावी असे आवाहन केले. शेवटी जनरल मॅनेजर बालाजी गाजूल यांनी सर्व ग्राहकांचे व निमंत्रितांचे आभार मानले. या प्रसंगी बाबू चव्हाण यांनी जास्तीत जास्त ग्राहकांनी शोरूम मध्ये येऊन गाडीची टेस्ट ड्राईव्ह घ्यावी आणि आपली गाडी लगेच बुक करावी असे आवाहन केले. या वेळी चव्हाण ऑटोमोबाइल्सच्या लक्ष्मी चव्हाण, अमृता चव्हाण, घनश्याम चव्हाण या सह सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होता.

## जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर या चार महिन्यांच्या एक तारखेला होणार मतदार नोंदणी

✔ सुराज्य/सोलापूर

भारत निवडणूक आयोगाने दिनांकावर आधारीतछायाचित्रासहमतदारयादीचाविशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. आयोगाच्या शिफारशीनुसार जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर २०२४ या चार महिन्याच्या प्रत्येक एक तारखेला १८ वर्षे पूर्ण झालेल्या व त्यावरील सर्व नागरिकांनी आपल्या क्षेत्रातील मतदार नोंदणी करता येणार आहे. याचा लाभ घेत मतदार नोंदणी करावी असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले आहे.

जाहीर केलेल्या चार महिन्याच्या प्रत्येक एक तारखेला १८ वर्षे पूर्ण झालेल्या व त्यावरील सर्व नागरिकांनी आपल्या क्षेत्रातील मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिदार यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

**पुनरिक्षण कार्यक्रमांचे टप्पे व कालावधी पुढील प्रमाणे**

✻ ०१ जून ते २० जुलै २०२३ या कालावधीत मतदार यादी संदर्भातील



सर्व कायदे आणि मार्गदर्शक सूचन प्रणालीबाबत नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

✻ २१ जुलै ते २१ ऑगस्ट २०२३ कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेव्दारा प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन पडताळणी.

✻ २२ ऑगस्ट ते २९ सप्टेंबर २०२३ कालावधीत मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण व प्रमाणिकरण करणे, मतदार यादी, मतदार ओळखपत्रातील त्रुटी दुर करणे.

✻ ३० सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत नमुना १-८ तयार करणे, १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित पुरवणी व एकत्रित प्रारूप यादी तयार करणे

✻ १७ ऑक्टोबर २०२३ या दिवशी एकत्रीकृत प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणे. १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२३ दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी

✻ २६ डिसेंबर २०२३ पर्यंत दावे व हरकती निकाली काढणे, अंतिम प्रसिध्दीसाठी आयोगाची परवानगी मागणे.

✻ ५ जानेवारी २०२४ मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करणे.



## दिवाणी व फौजदारी न्यायालयात योग दिन

**मंगळवेढा** : येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात जागतीक योग दिना निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगळवेढ्यातील प्रमुख दिवाणी व फौजदारी न्यायाधिश.एस.एन. गंगवाल-शहा या होत्या. या कार्यक्रमास दुसरे दिवाणी व फौजदारी न्यायाधिश पी. पी. बागुल , तीसरे दिवाणी व फौजदारी न्यायाधिश आर. एम. देवर्षी व मंगळवेढा बार असोशिएशनचे अध्यक्ष ॲड. उल्हास माने यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडला.योगशिक्षक संतोष दुधाळ यांनी योगाचे प्रत्यक्षिक दाखवून योग आणि प्रणायम या बाबत सविस्तर माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. आरती भिंगे यांनी केले तर आभार प्रदर्शन मंगळवेढा बार असोशिएशन चे खजीनदार ॲड. डी.एस. माने यांनी केले या कार्यक्रमास योगशिक्षक नितीन मोरे, ॲड. सुजय लवटे, ॲड. ॲड.आर.एल. बामने, ॲड. शिवाजी घुले, ॲड. विलासराव देशमुख, ॲड. सौ. मुजावर, ॲड. सौ. राणी चौधरी, ॲड. आर. डी. कुलकर्णी, ॲड. प्रदीप पवार, ॲड.. क्षिरसागर व न्यायालयातील सर्व कर्मचारी पक्षकार उपस्थितीत होते.

## वेगाने जाणारा ट्रॅक्टर चारीत उलटल्याने चालक ठार

**सोलापूर** : उसाचा गाळा सोबत जोडून वाहतूक करणारा ट्रॅक्टर चारीत उलटल्याने चालक जागीच ठार झाला. हा अपघात मंगळवेढा तालुक्यातील खूपसुंगी ते गोणेवाडी रोडवरील चौगुलेवस्ती जवळ बुधवारी रात्रीच्या सुमारास घडला. समाधान श्रीमंत डांगे (वय २७ रा. डोंगरगाव ता . मंगळवेढा) असे मयताचे नाव आहे. तो बुधवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास उसाच्या गाडा ट्रॅक्टरला जोडून डोंगरगाव येथे निघाला होता. तर उसाच्या गाड्यामध्ये नाना पांडुरंग शिंदे हे बसले होते. वाटेत स्टेरिंग वरील ताबा सुटून ट्रॅक्टर रोडच्या बाजूस चारित उलटल्याने समाधान डांगे हा मयत झाला . अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार पठाण पुढील तपास करीत आहेत .

## टेंभुर्णी येथे मोटारीच्या धडकेने दुचाकी चालक ठार

**सोलापूर** : पुणे महामार्गावरील टेंभुर्णी येथे वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेने दुचाकी वरील ५ ४ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन मयत झाले . हा अपघात काल गुरुवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडला . अपघाता नंतर चालक मोटार सोडून पसार झाला आहे. विभिषण दिगंबर गाडे (वय ५४ रा . अंबड ता.माढा ) असे मयत झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे . ते काल सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास दुचाकी वरून इंदापूर ते टेंभुर्णीच्या दिशेने निघाले होते . टेंभुर्णी येथील हॉटेल अभिमा श्री जवळ पाठीमागून एमएच१२-क्यूएम-८८८७ या क्रमांकाची मोटार धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन मयत झाले. या घटनेची फिर्याद मयताचे चुलत भाऊ भारत गाडे यांनी टेंभुर्णी पोलिसात दाखल केली . त्याप्रमाणे पोलिसांनी अपघातानंतर पसार झालेल्या मोटरचा लकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक फौजदार गुटाळ पुढील तपास करीत आहेत.

## सांगोल्यात भाजपच्या सोशल मीडिया पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा

**सांगोला** : गेल्या नऊ वर्षांत देशातील विकासाचे चित्र पार बदलून गेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने समाजातील प्रत्येक घटकापर्यंत लाभ पोचविणाऱ्या योजना दिल्यात, त्याची प्रभावी अंमलबजावणीही केली. प्रत्येक घरात केंद्र सरकारच्या योजनेचा लाभार्थी आहे. ही कामे, योजना सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रभावीपणे जनतेपर्यंत पोचवा, असा मंत्र भाजपचे सांगोला विधानसभा निवडणूक प्रमुख तथा सांगोला तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी आपल्या सोशल मीडिया सेलच्या पदाधिकाऱ्यांना दिला. या बैठकीला डॉ.विजय बाबर, प्रवीण जानकर, संजय गव्हाणे, मानस कमलापुरकर, प्रसाद फुले, सूर्यकांत इंगोले, ओंकार कुलकर्णी, अमोल लिगाडे, विकास सावंत, अनिल वाघमोडे, विशाल कुलकर्णी, सिध्देश्वर गाडे, कृष्णा कांबळे, सुरेश बुरांडे पप्पू पाटील, सोयजित केदार,बाळासो चव्हाण, किरण केदार,विनोद उबाळे, प्रथमेश आमणे, यांच्यासह भाजपच्या सोशल मीडिया सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## वेळापूर येथे रविवारी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस येथील श्रीकृष्ण पतसंस्था वेळापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते तथा मार्केट कमिटीचे संचालक उत्तमराव जानकर व धानोरे ग्रामपंचायत माजीसरपंच जीवन जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा सदन लाईफ लाईन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मिरज आणि अमोल पणासे यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जून २०२३ रोजी सकाळी १० वाजता मोफत आरोग्य व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये हृदयविकार, मेंदू विकार, बायपास शस्त्रक्रिया, मधुमेह, नेत्ररोग, अँजिओग्राफि, फिट, मोतीबिंदू, पॅरालिसिस, डोकेदुखी, चक्कर, स्नायूंचे आजार, हर्निया, मुळव्याध, पित्ताशयातील खडे, वयस्कर लोकांसाठी लघवींचे आजार, अपेंडिक्स, पोटांच्या व इतर शस्त्रक्रिया, एन्जोप्लास्टी आदी. रोगांवर तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केली जाणार आहे व गरज पडल्यास सवलतीच्या दरात ईसीजी, इको, टी एम टी, अँजिओग्राफि तपासण्या केल्या जाणार आहेत ,वरील तपासणीसाठी अथवा शस्त्रक्रियेसाठी हॉस्पिटलमध्ये जावे लागल्यास तपासण्यामध्ये ५० टक्के सवलत केस पेपर मध्ये, ५० टक्के सवलत ॲडमिशन व प्रोसिजर्स १० टक्के सवलत दिली जाणार आहे. वरील आजारावर शस्त्रक्रियेसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत महाराष्ट्र मधील व आरोग्य कर्नाटका या योजनेअंतर्गत कर्नाटक मधील पिवळ्या व केशरी कार्डधारकांसाठी व विविध शासकिय योजनेअंतर्गत मोफत उपचार केले जाणार आहेत. तरी गरजू नागरिकांनी या मोफत तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे अवाहन अमोल पनासे यांनी केले आहे. सदर मोफत आरोग्य तपासणी शिबिरासाठी नाव नोंदणी वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे९५०३७६४८८५, अमोल पनासे, जवान माने देशमुख, रोहित चव्हाण, समीर तांबोळी यांच्याकडे नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# अर्धनारीनटेश्वर नगरीत स्वागताची जय्यत तयारी

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी

**सुराज्य/वेळापूर**

**श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊलीं ची पालखी सोहळ्याचे २५ जून रोजी संध्याकाळी पाचच्या सुमारास वेळापूर हद्दीत आगमन होणार आहे. पालखीसोबत असणाऱ्या वारकऱ्यांची सोय व्हावी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर ग्रामपंचायत च्या वतीने विविध कामे करून पालखी सोहळा स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली असून वेळापूर ग्रामपंचायतीने नेटके नियोजन केले आहे.**

सदर पालखी सोहळ्याचे वेळापूर हद्दीत इको बोर्ड जवळ वेळापूर ग्रामपंचायत च्या वतीने वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण, गटनेते संजयआबा मंडले, ग्रामविकास अधिकारी पांडुरंग ठवरे, हनुमंत वायदंडे, नानासाहेब मुंगूसकर, शंकर आडत, रायचंद खाडे व इतर ग्रामपंचायत सदस्य हे पालखी सोहळ्याचे स्वागत करणार आहेत.

पालखी सोहळ्याच्या तयारीसाठी वेळापूर शहर व वाड्या वस्त्यावरचे मोकळे प्लॉट येथील काटेरी झुडपे काढण्यात आली. तसेच वेळापूर शहरातील सर्व गटारी स्वच्छ करण्यात येऊन त्यावर गटार पावडर फवारण्यात आले आहे. तसेच शुक्रवारी रोजी वेळापूर शहरात धुर फवारणी केली जाणार आहे. वेळापूर व परिसरातील रस्त्यामधील खड्डे मुरूम टाकून बुजवण्यात आले आहेत. पालखी तळावरील सर्व दुकाने काढून घेण्यात आली आहेत. तसेच पालखी तळावरील पादुका कट्ट्याजवळ मुरूम टाकून लेव्हलिंग रोलर ने करण्यात आली आहे व तळा जवळील काटेरी झाडे काढून सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. पालखी सोहळ्यातील टँकरला पाणी भरण्यासाठी वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने ८ विहरी ताब्यात घेऊन तेथे टँकर मध्ये पाणी भरण्याची सोय करण्यात आली आहे. वेळापूर शहरात १४ ठिकाणी १५०० मोबाईल टॉयलेटची उभारणी करून त्या ठिकाणी पाण्याची व लाईटची सोय करण्यात आली आहे. पालखीतळ व बुध्द विहार येथे महिलांसाठी विश्रांती कक्ष व स्नानगृहांची सोय करण्यात आली आहे तसेच पालखी चौक येथे आरोग्य विभाग, हिरकणी कक्ष ,चौकशी




> वेळापूर येथे पालखी सोहळ्याच्या जय तयारी सुरू असून महिलांसाठी पालखी चौक येथे हिरकणी कक्ष विश्रांती गृह व पालखी तळावर स्नानगृ हा ची सोय करण्यात आली आहे.
>
> – **रजनीश बनसोडे**, वेळापूर सरपंच

कक्ष याची उभारणी करण्यात आली आहे. पालखीतळाच्या चौफेर १६ स्टॅन्ड पोस्टद्वारे स्वच्छ पाण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच पालखी सोहळ्यात प्लास्टिक संकलन करण्यासाठी २० ठिकाणी नियोजन करण्यात आले आहे. वेळापूर गावातील हॉटेल व ग्रामपंचायतीच्या सौजन्याने सध्या तीव्र उष्णता असल्याने निवारा मंडपाचे नियोजन केले आहे .पालखी तळ हा प्रकाशमय करण्यात आला असून पालखी सोहळ्यात विजेची कोणतीही अडचण येऊ नये म्हणून वेळापूर ग्रामपंचायत च्या वतीने जनरेटरची सोय करण्यात आली आहे. तसेच सुरक्षिततेसाठी २ अग्निशाम काच्या गाड्या जय्यत तयार ठेवून नियोजन केले आहे. वारकऱ्यांच्या विश्रांतीसाठी १०० बाय १५० अशा प्रकारचे दोन मंडप फुले शाहू आंबेडकर नगर व पालखी तळावरील स्नानगृहाशेजारी उभारणी केली जाणार आहे. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना आंघोळी व कपडे धुण्यासाठी निरा कालवा उपविभाग यांच्यावतीने वेळापूर शहरात ठींक ठिकाणी चाऱ्यांच्या माध्यमातून पाणी सोडण्यात येणार आहे.

**आरोग्यविभाग....**

आरोग्य विभागाच्या वतीने वैद्यकिय वरिष्ठ अधिकारी डॉक्टर बी बी ओहाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी सोहळ्यासाठी उत्तम अशी तयारी करण्यात आली आहे. निमगाव रोड ते सांगोला रोड, खळवे येथे टँकर भरण्याच्या पॉईंट येथे पाण्याचे शुद्धीकरण, त्याचबरोबर पालखी मैदान, ठाकूर बुवा उघडेवाडी, तोंडले, बोंडले येथे औषध उपचार केंद्राची तयारी पूर्ण झाली आहे. त्याचबरोबर पालखी सोहळा बरोबर येणाऱ्या वारकऱ्यांना वेळापूर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे २४ तास औषध गोळ्या व तपासणी केली जाणार आहे.

**महावितरण विभाग....**

पालखी सोहळ्यासाठी महावितरण विभागाने पूर्ण तयार केले असल्याची माहिती वेळापूर सहाय्यक अभियंता भाऊसाहेब मोटे यांनी दिली. त्यांनी सांगितले की वेळापूर शहरासाठी एक फिटर होता.

यावर्षी दोन फिल्टर केले आहेत त्यामुळे पालखी सोहळा मुक्कामी काळात वीज पुरवठा सुरळीत देण्यास मोठी मदत झाली आहे महावितरण कडून गेल्या पंधरा दिवसात पालखी मैदान वेळापूर गावातील उच्च दाब वाहिन्या व लघुदाब वाहिन्या वितरण रोहित्रे, इत्यादी सर्व गोष्टींची देखभाल दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे तसेच महसूल विभागाच्या वतीने पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना जास्तीत जास्त गॅस सिलेंडर देण्याची व्यवस्था केली गेली आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त अक्कलकोट येथे अन्नछत्र मंडळाची बैठक

**सुराज्य/अक्कलकोट**



गुरुपौर्णिमा निमित्त उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय कार्यालय अक्कलकोट येथे प्रशासकीय अधिकारी, मंदिर समिती आणि अन्नछत्र मंडळाची बैठक संपन्न झाली.

दरम्यान बैठकीमध्ये आषाढी वारीसाठी आलेले भाविक वारीनंतर श्री स्वामी समर्थ दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येतात. त्यामुळे शहरात छोटे-मोठे वाहन मंदिर परिसराकडे येऊन गर्दी करणार नाहीत. त्या अनुषंगाने नगरपालिका यांचेकडून अक्कलकोट शहरातील महत्वाच्या ठिकाणी मजबुत स्वरूपाचे बॅरेगेटिंग करण्यात यावेत. कमलाराजे चौक, फत्तेसिंह चौक, कारंजा चौक, मैंदर्गी नाका, भक्त निवास हत्ती तलाव, समाधी मठ या ठिकाणी लाकडी बॅरेगेटिंग करून दोनचाकी वाहन मंदिर परिसर किंवा समाधी मठ परिसराकडे येणार नाहीत. याबाबत दक्षता घेणेबाबत मुख्याधिकारी सचिन पाटील यांनी सांगितले.

अन्नछत्र मंडळात असलेली पार्किंग व्यवस्था : मैंदर्गी रोडच्या बाहेर पडणाऱ्या गेट मधुनच प्रवेश करेल आणि तेथुनच बाहेर पडण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे असे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी सांगितले.

यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे आणि अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील असे सांगितले.

बैठकीला नायब तहसीलदार विकास पवार, मुख्याधिकारी सचिन पाटील, पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, सचिव शामराव मोरे, विद्युत महावितरणचे कनिष्ठ अभियंता वैभव माडेकर, कार्यालयाचे धनराज शिंदे, गोपनीय कर्मचारी शरद चव्हाण, गजानन शिंदे उपस्थित होते.

## वारकऱ्यांसाठी सज्ज आहे निर्मल वारी टीम

**सुराज्य/वेळापूर**

आषाढी वारी सोहळ्यामध्ये २०१५ साली फक्त ३ गावं,अडीचशे पोर्टेबल संडास आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे व खाजगी १५०० स्वयंसेवक इथपासून सुरू झालेला प्रवास त्याच्या पुढच्या वर्षी म्हणजे २०१६ साली रोटेशन पध्दतीने मोजल्यावर २१ हजार पोर्टेबल संडास, ९ हजार स्वयंसेवक (यात ४०० विद्यार्थी) आणि ३० गावं इथपर्यंत पोहचला. तर २०१९ साली रोटेशन पध्दतीने मोजल्यावर २८ हजार पोर्टेबल संडास, साडे बारा हजार स्वयंसेवक (यात ४८५० विद्यार्थी) इथपर्यंत पोहचला आहे. यासाठी जवळपास सहा महिने आधी नियोजन केले जाते, प्रत्यक्ष वारीत रोजच्या रोज कामाचा आढावा घेतला जातो.

निर्मल वारीची टीम वारकऱ्यांच्या सेवेसाठी यावर्षी सज्ज असून माळशिरस तालुक्यात ठिकठिकाणी वारकऱ्यांना स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**सेवा देण्यासाठी यांना करा संपर्क !**

निर्मल वारी मध्ये स्वयंसेवक म्हणून सेवा देण्यासाठी नातेपुते येथे राहुल पदमन (९८२३३ ४२२५२), माळशिरस येथे सुरेश वाघमोडे (९७६६९४०९१८), वेळापूर येथे सुनील कुदळे (९०९६९१८८७४), भंडीशेगाव येथे महेंद्र नाना (९४०३७३०१०७) तर अकलूज येथे शेखर माने ( ८६००४३२१७४), विश्वजित देशपांडे (७३८५१ ८४८४१), बोरगाव येथे डॉ जयसिंग पाटील ( ९८२३२ ५५७५५), पिराची कुरोली कुलदीप पाटील ( ९०९६६ २६२६२) येथे ,यांना संपर्क करू शकता.

यासाठी गेले सहा महिन्यांपासून नियोजन सुरू असून तयारी सुध्दा आता पूर्ण झाली असून माळशिरस तालुक्यातून या अभियानात जास्तीत जास्त स्वयंसेवकांनी सेवा देण्याचं आवाहन निर्मल वारी टीम कडून करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मार्गावर नातेपुते माळशिरस वेळापूर त्याचबरोबर वाखरी भंडीशेगाव पंढरपूर आदी ठिकाणी तर संत तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गावर अकलूज, बोरगाव, पिराची कुरोली, वाखरी व पंढरपूर या ठिकाणी निर्मल वारी अंतर्गत पोर्टेबल संडास उभारण्यात येणार आहेत.

## स्वामी समर्थांची भक्ती प्रेरक : गोऱ्हे

**अक्कलकोट** : जनकल्याणा साठी स्वामी समर्थांची भक्ती आम्हाला प्रेरक असल्याचे मनोगत विधान परिषदेचे उपसभापती निलमताई गोऱ्हे यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी चेअरमन नगरसेवक महेश इंगळेंच्या अध्यक्षतेखाली सचिव आत्माराम घाटगेंनी सन्मान केला.



## दुधाच्या दरवाढीकडे दुर्लक्ष केल्यास शेतकऱ्यांची नाराजी धोक्याची ठरेल : डॉ. देशमुख

**सुराज्य/सांगोला**

पावसाने ओढ दिल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून शेतीतून होणारा तोटा भरुन काढण्यासाठी दुभती जनावरे पाळून दूधाच्या पूरक व्यवसायावर आपला प्रपंच कसाबसा सांभाळणाऱ्या शेतकऱ्याचा दुग्ध व्यवसायही सरकारच्या चुकिच्या धोरणांमुळे संकटात सापडला असून शेतकरी वर्ग अडचणीत आला आहे.

त्यामुळे,दुधाच्या दरवाढीकडे शासनाने दुर्लक्ष केल्यास शेतकऱ्यांची नाराजी ही सत्ताधाऱ्यांसाठी धोक्याची ठरेल,असा गंभीर इशारा शेकाप नेते डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगोला येथे शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आयोजित केलेल्या रास्ता रोको आंदोलना दरम्यान बोलताना दिला.

दूध दरवाढीच्या मागणीसाठी सांगोला येथील पंचायत समिती समोरील मिरज-पंढरपूर हायवेवर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने युवा नेते डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे नेतृत्वाखाली नुकतेच रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.यावेळी, दूध दरवाढीच्या मागणीचे निवेदन तहसीलदार संजय खडतरे यांनी पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांच्या उपस्थितीत स्विकारले. यासमयी, सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब ठोकळे,युवा नेते दत्ता टापरे, माजी उपसभापती नंदकुमार शिंदे,तुषार इंगळे आदींनी आपले विचार व्यक्त केले.

याप्रसंगी,खरेदी विक्री संघाचे चेअरमन इंजि.रमेश जाधव,शेकापचे चिटणीस दादासाहेब बाबर,उद्योगपती बाळासाहेब एरंडे,कृषि उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन समाधान पाटील,माजी चेअरमन गिरीश गंगथडे,सूतगिरणीचे व्हा.चेअरमन ॲड. नितीन गव्हाणे,संचालक अवधूत कुमठेकर,माजी नगरसेवक सुरेश आप्पा माळी,चंद्रकांत सरतापे,वैभव केदार,विष्णू देशमुख,दीपक गोडसे यांच्यासह शेकापचे जेष्ठ पदाधिकारी,कार्यकर्ते व दूध उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी,पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## साटम यांनी स्वीकारला मंगळवेढा पोलीस स्टेशनचा कार्यभार

**सुराज्य/मंगळवेढा**



मंगळवेढा पोलिस ठाण्याकडील पदभार प्रशिक्षणार्थी पोलिस अधीक्षक नयोमी दशरथ साटम यांनी स्विकारला असून सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचून आपण प्रशिक्षण कालावधीत काम करणार असल्याचे प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

प्रशिक्षणार्थी पोलिस अधिक्षक नयोमी साटम या सन २०२१ च्या बॅचच्या असून त्यांचे मूळ गाव कोकणातील कणकवली जि.सिंधुदुर्ग आहे.त्यांचा प्रशिक्षण कालावधी दि.१९ जून ते ९ सप्टेंबर २०२३ असा राहणार आहे.या कालावधीत शहरातून होणारी जड वाहतूक बंद करणे,अवैध व्यवसायावर कारवाई,कॉलेजला भेटी देवून मुलींबाबत असणाऱ्या समस्या जाणून घेणे,वाहतुक नियंत्रीत करणे,रात्रीची गस्त वाढविणे,सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचून त्यांच्या अडचणी दूर करणे आदी कामे करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. येथील पोलिस निरिक्षक रणजित माने हे पुढील आदेशापर्यंत नियंत्रण कक्षात हजर राहून कामकाज पाहतील असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान,प्रशिक्षणार्थी महिला पोलिस अधिकारी कडक शिस्तीच्या असून मंगळवेढा पोलिस स्टेशनला हजर होणार असल्याची वार्ता वाऱ्यासारखी शहर व परिसरात पसरल्यानंतर ढाब्यावरून अवैध दारू विक्री करणारे,बेकायदा वाळू उपसा करणारे,मटका घेणारे या व्यवसायिकांमधून एकच खळबळ उडाली आहे.

# प्रश्न लवकर मार्गी न लागल्यास आंदोलन : म्हेत्रे

## दुधनी शहरातील विविध समस्यांबाबत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**सुराज्य/अक्कलकोट**



नागरिकांच्या समस्या चार ते पाच दिवसात दूर करावे अन्यथा युवक काँग्रेस आघडीच्यावतीने नगर परिषदेवर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे यांनी लेखी निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे.

दुधनी शहरातील विविध समस्यां संदर्भात दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे यांच्या नेतृत्वात काँग्रेस युवक आघाडीच्या कार्यकर्त्यांच्यावतीने मुख्याधिकरी आतिश वाळुंज यांना निवेदन देण्यात आले.

शहरातील काही भागात रोज रस्ते सफाई होत नाही. काही भागात कचरा गोळा करण्यासाठी घंटा गाडी येत नाही अशी ओरड सुरू आहे. कचरा गोळा करण्यासाठी घंटा गाडी येत नसल्याने प्रत्येक त्या त्या भागातील प्रत्येक घरा-घरांमध्ये कचरा साचुन ठेवण्यात आली आहे.

सद्या पावसाळा सुरू होऊन महिना लोटला तरी पावसाचा पत्ता नाही. उन्हाचे तीव्र चटके लागत आहे. अशा स्थितीत दुधनी शहरात आठ - दहा दिवसात एकदा पाणी पुरवठा होत आहे.

पाणीपुवठा विभागात साहित्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडून उत्तम दर्जाचे साहित्य पुरवठा केला जातो की नाही, याची तपासणी करण्यात यावे अशी मागणी निवेदन माध्यमातून करण्यात आली आहे.

यावेळी दुधनी शहर काँग्रेस युवक आघाडीचे अध्यक्ष शशिकांत सावळसुर, माजी नगरसेवक डॉ. उदयकुमार म्हेत्रे, लक्ष्मीपुत्र हबशी, संगमनाथ म्हेत्रे, शामराव गद्दी, महांतेश पाटील, शांतेश धोडमनी, विश्वनाथ म्हेत्रे, गुरूशांत हबशी, रेवणसिध्द पाटील, दयानंद म्हेत्रे, मल्लिनाथ कोटनुर, चंद्रकांत अल्लापुर, प्रवीण मदरी यांच्यासह अन्य नागरिक उपस्थित होते.

> मागील दिड वर्षांपासून नगरपरिषदेवर प्रशासकीय कारभार सुरू आहे. या काळात शहरातील काही भाग दुर्लक्षित झाले आहेत. या दुर्लक्षित भागातील नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे, तरी मुख्याधिकाऱ्यांनी शहरातील नागरिकांच्या समस्यांकडे लक्ष द्यावे आणि समस्यातून सुटका करावी
>
> – **प्रथमेश म्हेत्रे** (माजी सभापती, कृ.ऊ.बा. समिति दुधनी)

## महत्त्वाचे वृत्त

### राज्यात ४६४४ तलाठ्यांची पदे भरणार

**नागपूर** : राज्यात ४६४४ तलाठी पदाच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. ही पदभरती ऑनलाइन परीक्षेच्या माध्यमातून होणार असून कुठल्याही शाखेतील पदवीधराला यासाठी २६ जून ते १७ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे. राज्यातील लाखो उमेदवार तलाठी पदाच्या भरतीची अनेक दिवसांपासून वाट पाहत होते. ३६ जिल्ह्यांसाठी ही जाहिरात असून उमेदवारांना कुठल्याही जिल्ह्यासाठी अर्ज करता येणार आहे. सध्या परीक्षेची तारीख ठरली नाही. संकेतस्थळावर ती प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दोनशे गुणांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार असून ती वस्तुनिष्ठ पद्धतीने घेण्यात येणार आहे. एकूण गुणांच्या ४५ टक्के गुण घेणे आवश्यक राहणार आहे. अर्जदारांना ९०० रुपये परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे.

### पुणेकर यांनी केला बीआरएसमध्ये प्रवेश

**हैद्राबाद** : प्रसिद्ध लोककलावंत आणि लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम केला आहे. सुरेखा यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत हैदराबादच्या भारत राष्ट्र समितीत प्रवेश केला. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या उपस्थितीत सुरेखा पुणेकर यांनी काल (२२ जून) पक्षप्रवेश केला. गेल्या काही दिवसांपासून अनेक कलाकार हे राजकीय पक्षात प्रवेश करताना दिसत आहेत. आपल्या घुंगरांच्या तालावर सगळ्यांना नाचवणाऱ्या आणि सौंदर्याने सगळ्यांना घायाळ करणाऱ्या लोकप्रिय नृत्यांगणा सुरेखा पुणेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम करत दुसऱ्या पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

### व्यावसायिकांच्या निवासस्थानी ईडीची दोन पथके

**सांगली** : सांगलीतील व्यावसायिक पारेख बंधूंच्या निवासस्थानी सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) पथकाने चौकशी सुरू केली आहे. पारेख बंधूंचा विद्युत साहित्य विक्रीचा व्यवसाय आहे. सांगलीमध्ये आज सकाळी ईडीचे दोन पथके दाखल झाली असून, दोन पथकांच्या मदतीने शिवाजीनगरमधील पारेख बंधूच्या दोन बंगल्यांमध्ये ईडीचे अधिकारी चौकशी करत आहेत. ईडीचे अधिकारी चौकशी करत असलेल्या बंगल्याबाहेर केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान तैनात आहेत. पारेख हे सांगलीतील बडे व्यावसायिक असून चौकशीचा अधिकृत तपशील देण्यास मात्र ईडीच्या अधिकाऱ्यांचा नकार दिला.

### नागपूर विद्यापीठाच्या नावावर बनावट पदव्या

**नागपूर** : बनावट पदवी वाटपाच्या कोहचाळे प्रकरणात यापूर्वीही बदनाम झालेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदवी संदर्भात नवा प्रकार समोर आला आहे. विद्यापीठाच्या नावाने बनावट पदव्या तयार करून २६ जणांनी थेट इराकमध्ये नोकरी मिळविल्याची धक्कादायक माहिती आहे. इराक दुतावासाकडून या पदव्यांच्या पडताळणीसाठी विद्यापीठ आणि महविद्यालयासोबत झालेल्या पत्रव्यवहारातून ही बाब उघड झाली आहे. विद्यापीठाच्या पदवी आणि गुणपत्रिका तपासणी विभागाकडून या सर्व पदव्या आणि गुणपत्रिकांची शहानिशा केली असता, विद्यापीठाचा लोगो आणि कुलगुरूंची स्वाक्षरी असलेल्या या पदव्या आणि गुणपत्रिका बनावट असल्याचे आढळून आले.

### नाशिकमधून साडेचार लाखांचा गुटखा जप्त

**नाशिक** : प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करणाऱ्यासह अशा गुटख्याची मोठ्या प्रमाणावर साठवणूक करणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली. या कारवाईत ४ लाख ४३ हजारांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखेने ही कारवाई केली असून, इंदिरानगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. वडाळा गावातून एक संशयित प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करीत असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट एकचे अंमलदार मुक्तार शेख यांना मिळाली होती. क्विवा मोपेडवरून विमल पानमसाला, आरएमडी मसाला, एम सेन्टेड तंबाखू गोल्ड असा प्रतिबंधित गुटखा घेऊन जात असताना संशयित मोहम्मद साजिद मोहम्मद नासीर अन्सारी याला उपनिरीक्षक चेतन श्रीवंत यांच्या पथकाने पकडले. त्याच्याकडून ४९ हजार १५६ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला.

### पार्सलला झाला लेट अन् इन्क्वायरी पडली ९० हजारांना

**छ.संभाजीनगर** : हर्बल लाइफ प्रॉडक्टचे बुक केलेले पार्सल का आले नाही, याची ॲपद्वारे माहिती घेत असताना अज्ञात व्यक्तींने दिलेल्या लिंकवर माहिती भरणाऱ्या व्यक्तीच्या खात्यातून सायबर चोराने ९० हजार रुपये ट्रान्सफर केले. ही घटना हर्सूल परिसरातील देवगिरी केशदीप सोसायटी घडली. या प्रकरणी मच्छिंद्रनाथ शेकू कोरडे (वय ५९, रा. देवगिरी केशरदीप हाउसिंग सोसायटी, हर्सूल) हे खासगी नोकरी करतात. त्यांनी 'हर्बल लाइफ'चे प्रॉडक्ट बुक केले होते. मात्र, हे पार्सल आले नाही. त्यामुळे त्यांनी कुरिअर ट्रॅकर या ॲपमध्ये डिलिव्हरी साइट चेक केली. या साइटच्या हेल्पलाइनवर ट्रॅकिंग चेक केले. या दरम्यान कोरडे यांना एका अनोळखी नंबरवरून फोन आला. 'तुम्हाला एक लिंक पाठवली आहे. त्या लिंकवर तुम्ही माहिती भरण्याबाबत सांगितले. ही प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तुमचे पार्सल दिलेल्या पत्त्यावर पाठवण्यात येईल,' असे त्या फोनवरून बोलणाऱ्या व्यक्तींने सांगितले.

### गोंडस चिमुकला खेळता खेळता खड्ड्यात पडला

**कोल्हापूर** : बांधकामासाठी पाणी साठवणूक करून ठेवण्यासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यातील पाण्यात बुडून दीड वर्षाच्या बाळाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना कोल्हापुरातील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील सुदान फार्मा कंपनीमध्ये घडली आहे. विराज अमोल मालवाणे असं सदर लहानग्याचं नाव आहे. या कंपनीमध्ये अमोल अशोक मालवाणे (रा. यळगूड) हे सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत असून सहपरिवार येथेच कंपनी आवारातच वास्तव्यास आहेत. बुधवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास त्यांचा दीड वर्षाचा मुलगा विराज अमोल मालवाणे हा खेळत खेळत घराबाहेर आला आणि घरानजीक पाणी साठवून ठेवण्यासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात पडला.

### तरुणाने वेटरवर सपासप वार करून केली हत्या

**धाराशिव** : तंदुर रोटी वेळेत का दिली नाही म्हणून ग्राहकाने वेटरची निर्घृण हत्या केल्याची घटना भूम तालुक्यातील अंबी येथे अंबीजवळील अंबिका ढाबा येथे रात्री ८:३० वाजता आशिष बिभीषण शेजाळ (वय २७ वर्षे) हा तंदुर रोटी पार्सल आणायला गेला होता. तंदुर रोटी ऑर्डर केल्यानंतर तंदुर रोटी वेळेत न दिल्यामुळे चिडलेल्या आशिष बिभीषण शेजाळ याने हॉटेल अंबिका येथील वेटर लक्ष्मण उर्फ बप्पा पांडुरंग नलवडे (वय ३० वर्षे) याच्याशी हुज्जत घातली. वादावादी होऊन चिडलेल्या अशिष शेजाळ याने लक्ष्मण नलवडे याच्या छातीवर, पोटावर, पोटाच्या डावे बाजूस चाकूने सपासप वार केले. यात लक्ष्मण नलवडे हा गंभीर जखमी झाला.

### राज्यात भाज्यांचे दर कडाडणार?

**पुणे** : लांबलेला मोसमी पाऊस, सिंचनासाठीच्या पाण्याचा तुटवडा आणि वाढलेल्या तापमानामुळे राज्यातील फळभाज्या आणि पालेभाज्यांच्या लागवडीत मोठी घट झाली आहे. खरिपातील सरासरी लागवडीच्या वीस टक्केही लागवड झालेली नाही. त्यामुळे जुलै, ऑगस्ट महिन्यांत भाज्यांचा तुटवडा निर्माण होऊन दर कडाडण्याची शक्यता आहे. राज्यात वर्षभरात सुमारे ११ लाख ५२ हजार हेक्टरवर भाजीपाल्याची लागवड होते. त्यांपैकी खरिपात म्हणजे जून महिन्यात ५० टक्के, रब्बी हंगामात ३० टक्के आणि उन्हाळी हंगामात २० टक्के क्षेत्र असते. पण, यंदा मोसमी पाऊस लांबला आहे.

# स्मार्ट सिटी योजनेतून शहरात पायाभूत सुविधा सक्षम करण्याचा प्रयत्न

## ● एकूण ४७ कामांपैकी ४१ कामे पूर्ण तर ६ प्रकल्प प्रगतीपथावर!
## ● आठव्या वर्षपूर्ती निमित्त सीईओ शीतल तेली-उगले यांची माहिती

**सुराज्य/सोलापूर**

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेस आठ वर्षे पूर्ण झाले आहेत. या योजनेमुळे सोलापूर शहरातील पायाभूत सोयी - सुविधा सक्षम करण्याचा प्रयत्न सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या माध्यमातून करण्यात आला आहे. आतापर्यंत १हजार ६९४ कोटी रुपयाची कामे हाती घेतली असून ६०६ कोटींची ४१ कामे पूर्ण झाली आहेत तर १हजार ३७ कोटी रुपयांची रुपयांचे सहा प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. त्यात प्रामुख्याने ८९५ कोटींच्या उजनी - सोलापूर समांतर जलवाहिनीचा समावेश असल्याची माहिती स्मार्ट सिटीच्या सीईओ शितल तेली - उगले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्मार्ट सिटी मिशनची घोषणा दि. २५ जून २०१५ रोजी केली होती. त्या स्मार्ट सिटी मिशनला आठ वर्षे पूर्ण झाले आहेत. त्या निमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत सोलापूर शहरात झालेल्या स्मार्ट सिटी योजनेअंतर्गतच्या



कामांची माहिती सीईओ शितल तेली - उगले यांनी दिली. सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन अंतर्गत या योजनेमध्ये आजपर्यंत विविध विकासकामे हाती घेतली आहेत. एकूण १ हजार ६९४ कोटी रुपयांची कामे हाती घेतली. ६०६ कोटींची ४१ कामे पूर्ण झाले आहेत. १ हजार ३७ कोटी रुपयांचे सहा प्रकल्प सध्या प्रगतीपथावर आहेत.

सोलापूर शहरातील पाणीपुरवठा सुधारणा आणि सिव्हरेज सिस्टीम सुधारण्यासाठी शहरातील खूप जुन्या पाईपलाईन बदलण्यात आल्या. साधारणतः ९० किलोमीटर पाणी पाईपलाईन आणि ८५ किलोमीटर सिव्हर पाईपलाईन बदलण्यात आली. त्यामुळे पाणीपुरवठा सुधारणा होऊ शकतो. त्याचबरोबर याच ठिकाणी रस्त्याची देखील दुरुस्ती करण्यात आली आहे. कमांड अँड कंट्रोल सेंटरचे काम येत्या दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण होऊ शकणार आहे. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण करण्यासाठी या सेंटरचा उपयोग होणार आहे. केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी अशा इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या उभारणीनंतर त्यामध्ये शहरातील सुरक्षा व्यवस्था, रकाडा प्रणालीचे नियंत्रण, ऑटोमॅटिक ट्रॅफिक सिग्नल, ई - चलन सिस्टीम इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत, असेही असे सीईओ शितल तेली - उगले यांनी सांगितले. १०.८ किलोमीटर रस्ते विकासाची कामे करण्यात आली आहेत. पाण्याची पाईपलाईन व ड्रेनेज लाईन पावसाळी गटार इत्यादींचे कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

स्मार्ट रोड फेज - २ अंतर्गत पायलट प्रोजेक्ट म्हणून शहरातील रंगभवन चौक ते डफरीन चौक ते डॉक्टर आंबेडकर चौक हा सुमारे १.१ किमीचा रस्ता रिडिझाईन करण्यात आला आहे शहरात लक्ष्मी मार्केट हेरिटेज स्ट्रक्चरचे पुनर्जीवन, हेरिटेज वस्तूचे पुनर्जीवन अंतर्गत इंद्रभवन इमारतीचे सुशोभीकरण, सिद्धेश्वर तलाव विकास, सिद्धेश्वर तलाव सुधारणा, लाईट अँड साऊंड शो, होम मैदान नूतनीकरण, हुतात्मा गार्डन फेस - २ अंतर्गत सुधारणा करण्यात आल्या आहेत. उद्यान विभाग अंतर्गत पासपोर्ट ऑफिसलगत एडवेंचर पार्क करण्यात आले आहे.

घनकचराव्यवस्थापना अंतर्गत दररोज २७० टन कचरा संकलन करण्यात येत आहे. ट्रान्सफर स्टेशन उपकरणे, ट्रान्सफरस्टेशन सिव्हील, डस्टबिन यासह विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. करारानुसार मुदतीनंतर या सर्व प्रकल्पाचे मेंटेनन्सचे काम महापालिका प्रशासन नियमितपणे करू शकणार आहे, असेही सीईओ शितल तेली - उगले यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस नगर अभियंता लक्ष्मण चलवादी हे उपस्थित होते.

### सावरकर तलावाचे काम महिन्यात पूर्ण होणार

वीर सावरकर जलतरण तलावाचे काम हे येत्या महिनाभरात पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच सीएसआर व इतर नाविन्यपूर्ण निधी अंतर्गतही इथे कामे करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत विविध विकास कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या सर्व सुविधा जतन करणे व त्याचे योग्य वापर करून संवर्धन करणे गरजेचे आहे. नागरिकांनी या सर्व सुविधा स्वतःच्या मानून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही शितल तेली – उगले यांनी केले आहे.

### उड्डाणपूल : ८ पैकी ३ निवाडे घोषित

सोलापूर शहरात दोन उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. त्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान फेज वनच्या पहिल्या पुलासाठी एकूण आठ पैकी तीन निवाडे घोषित करण्यात आले आहेत. दोन निवाडे जिल्हाधिकारी यांच्याकडे आहेत तर उर्वरित निवाडे छोटे आहेत. तेही लवकरच घोषित करण्यात येतील. त्यानंतर या कामाला अधिक गती येईल, असेही सीइओ शितल तेली – उगले यांनी स्पष्ट केले.



# 'गुड टच बॅड टच' उपक्रम राज्यभर राबवावा : डॉ. नीलम गोऱ्हे

**सुराज्य/पुणे**

बालकांचे आरोग्य, विकास, सुरक्षितता, शिक्षण यासाठी युनिसेफ व भारत सरकार यांच्यात सहकार्य करार झाला आहे. याअंतर्गत बालकांचे लैंगिक शोषण रोखण्यासाठी उपयुक्त ठरलेला ग्रॅव्हिट्स फाउंडेशनचा 'गुड टच बॅड टच' उपक्रम बालकल्याण व शिक्षण विभागाने राज्यभर राबवावा, अशी सूचना महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज येथे केली. बाल न्याय अधिनियम आणि बालकांच्या सुरक्षिततेचे इतर कार्यक्रम मराठीमधून उपलब्ध करून देण्याची मोहीम हाती घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

ग्रॅव्हिटस फाउंडेशनच्या संस्थापिका-अध्यक्षा उषा काकडे यांच्या पुढाकाराने युनिसेफ व ग्रॅव्हिटस फाउंडेशनतर्फे 'बाल आरोग्य, विकास व त्यांचे अधिकार' या विषयावरील राज्यस्तरीय परिषदेच्या उद्घाटनावेळी डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. या परिषदेला युनिसेफच्या महाराष्ट्र प्रमुख राजेश्वरी चंद्रशेखर, 'सिंबायोसिस'च्या संचालिका डॉ. विद्या येरवडेकर, दिग्दर्शिका फराह खान, अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे, बालनाट्य दिग्दर्शक संजय हळदीकर, बालरोगतज्ज्ञ डॉ. अमिता फडणीस, ॲड. दिव्या चव्हाण, ट्रान्सजेंडर क्टीविस्ट लक्ष्मीनारायण त्रिपाठी, महिला व बालकल्याण उपायुक्त राहुल मोरे, अतिरिक्त पोलीस महासंचालक (कारागृह) अमिताभ गुप्ता, सामाजिक कार्यकर्त्या जुगनू गुप्ता, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यांनी विचार मांडले. बालकांसाठी काम करणारे कार्यकर्ते, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

ॲड. दिव्या चव्हाण यांनी सांगितले की, न्यायालयातील वातावरण बालस्नेही व्हावे, यासाठी 'चाईल्ड फ्रेंडली कोर्ट' कल्पनेचा विचार व्हावा. जुगनू गुप्ता, स्वाती मोहापात्रा, अरुण खोरे यांनीही मनोगत व्यक्त केले. लीना सलढाणा-जोशी यांनी सूत्रसंचालन केले. संघमित्रा खोरे यांनी आभार मानले.

# भाजपला सत्तेतून पायउतार करण्याचा निर्धार

## पाटण्यात एकवटले देशातील १५ विरोधी पक्षनेते

**सुराज्य/पाटणा**

येत्या लोकसभेच्या निवडणुकीतल देशातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्रित येऊन भाजपला सत्तेतून पायउतार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंबंधी पाटण्यात आज मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली देशातील प्रमुख विरोधी पक्षनेत्यांची बैठक झाली. त्यामध्ये देशातील विरोधी पक्षांनी किमान समान कार्यक्रमाची तयारी करण्याचा निर्णय घेतला. तसेच या बैठकीत दिल्लीतील अध्यादेशावर काँग्रेसने राज्यसभेत आपच्या बाजूने समर्थन द्यावे अशी मागणी आज राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी केल्याची माहिती आहे.

मोदी हुकूमशहाप्रमाणे देशाचं नेतृत्व करत आहेत, त्यामुळे भाजपला सत्तेतून पायउतार करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले, ते म्हणाले की, भारताच्या मूलभूत विचारांवर आक्रमण केलं जात आहे, भारताच्या मूलभूत संस्थांवर हल्ले केले जात



आहेत. ही विचारांची लढाई आहे. आमच्यातही काही मतभेद असतील पण सर्वांना एकत्रित करुन, सर्वांचे विचार घेऊन आम्ही एकत्रित जाणार आहोत.

बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या की, पाटण्यातून जी आंदोलनं सुरू झाली ती नंतर मोठी झाली हा इतिहास आहे. त्यामुळे ही बैठक दिल्लीत नाही तर पाटण्यात घेण्याचा विचार मी मांडला.

### वाहन दुभाजकावर आदळून चार ठार

**यवतमाळ** : चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा येथून परत येत असताना घुगूसजवळ वाहन दुभाजकावर आदळून उभ्या ट्रकला जबर धडक दिली. या भीषण अपघातात मारेगाव येथील चौघेजण जागीच ठार झाले. ही घटना आज शुक्रवारी दुपारी २ वाजता दरम्यान घडली. अपघातात रफीक नबी वस्ताद शेख, त्यांची पत्नी संजिदा रफीक शेख, युसूफ नबी वस्ताद शेख, त्यांची पत्नी मुमताज युसूफ शेख रा.मारेगाव हे जागीच ठार झाले.

# राज्यातील युवतींना मिळणार स्वसंरक्षणाचे धडे : लोढा

**सुराज्य/मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त राज्यात ३ लाख ५० हजार शाळकरी, महाविद्यालयीन युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. महिला व बालविकास विभाग आणि राज्यातील सर्व विद्यापीठे व स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून ३ ते १५ जुलै दरम्यान तीन दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे अशी माहिती, महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मंत्रालयातील दालनात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी महिला व बालविकास विभागाचे उपायुक्त राहुल मोरे, उपसचिव श्री. ठाकूर, महिला व बालविकास विभागाचे अधिकारी, मुंबई विद्यापीठ, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, भारतीय स्त्री शक्ती संस्था आणि विद्यार्थी निधी ट्रस्ट यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री श्री. लोढा म्हणाले, अलीकडील काळात महिला व मुलींवर होणारे अत्याचार व त्यातून केली जाणारी त्यांची हत्या हे शासनासमोरील व समाजासमोरील आव्हान ठरत आहे. याला आळा बसण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे खुपच आवश्यक आहे. शाळकरी व महाविद्यालयीन युवतींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी राज्यात राजमाता जिजाऊ



युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. आयुक्त, महिला व बाल विकास या कार्यालयामार्फत राज्यातील सर्व विद्यापीठे व स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने महाविद्यालयीन युवतींसाठी तालुकास्तरावर विद्यापिठांच्या मदतीने स्वसंरक्षण शिबीरांचे आयोजन करण्यासाठी नियोजन करण्यात आलेले आहे.

स्थानिक महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, स्थानिक सामाजिक संस्था, महाविद्यालयीन एनएसएस, स्थानिक पोलीस यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडावा.

महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था या स्वायत्त संस्थेच्या माध्यमातून राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या स्तरावर अव्यावसायिक तत्वावर आज मुंबई विद्यापीठ, एस. एन.डी. टी., भारतीय स्त्री शक्ती संस्था आणि विद्यार्थी निधी ट्रस्ट यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आला.

# आता पाचवी, आठवीच्या वार्षिक परीक्षेत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होणे बंधनकारक

**सुराज्य/पुणे**

आता, पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. पुढील वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी पाचवी आणि आठवी वर्गाची वार्षिक परीक्षा विद्यार्थ्याला उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य सरकारने अधिसूचना जारी केली आहे. याआधी पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा होत असे. मात्र, पुढील वर्षात प्रवेश घेण्यासाठी उत्तीर्ण होणे बंधनकारक नव्हते.

राज्यात शालेय शिक्षणासाठी शिक्षण विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने शिक्षण हक्क कायदा २०११ मध्ये सुधारणा केली असून, पाचवी आणि आठवीसाठी वार्षिक परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने आज जारी केलेल्या आदेशानुसार, आता पुढील वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी पाचवी आणि आठवी वर्गाची वार्षिक परीक्षा विद्यार्थ्याला उत्तीर्ण होणे बंधनकारक असणार आहे. इयत्ता पाचवी आणि आठवी वार्षिक परीक्षेत विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास पुनर्परीक्षेचा पर्याय विद्यार्थ्याला देण्यात आला आहे. पुनर्परीक्षेतही विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण झाल्यास इयत्ता पाचवी आणि आठवी वर्गातच त्या विद्यार्थ्याला ठेवले जाणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या आदेशानुसार, पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना वयानुरूप वर्गात प्रवेश दिला जाणार आहे. सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना पाचवीच्या वर्गासाठी निश्चित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असणार आहे.विद्यार्थी पाचवीची परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्याला पाचवीच्याच वर्गात प्रवेश दिला जाईल.

# कशी नशिबाने थट्टा आज मांडली...

# एकेकाळची लावणी सम्राज्ञी रस्त्यावर हात जोडून जीवन जगतेय

**सुराज्य/अहमदनगर**

एकेकाळची लावणी सम्राज्ञी जिच्या अभिनयाने लालबाग परळचे हनुमान थिएटर वन्स मोअर टाळ्या आणि शिट्ट्यांनी गर्जले. चाळीस वर्षांपूर्वी तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने तमाशाच्या अनेक चाहत्यांना थक्क केले होते. त्या महाराष्ट्राच्या लावणी सम्राज्ञीला जीवनाशी संघर्ष करावा लागत आहे. कोपरगावचे बसस्थानक हे त्यांचे घर झाले असून त्या अत्यंत दयनीय अवस्थेत जगत आहेत. शांताबाई लोंढे उर्फ शांताबाई कोपरगावर या लावणी सम्राज्ञीच्या नशिबाने आज जणू थट्टाच मांडली आहे. उतरत्या वयातील त्यांची अवस्था पाहून सारा महाराष्ट्र अस्वस्थ झाला आहे.

एकेकाळी याच शांताबाईंनी लावणी नृत्याने उत्तर महाराष्ट्राला प्रसिद्धी मिळवून दिली होती. लालबाग परळचे हनुमान थिएटर लोकप्रिय झाले. त्यांची कला, सौंदर्य आणि लोकप्रियता पाहून चाळीस वर्षांपूर्वी कोपरगाव बस स्थानकाचे कर्मचारी अत्तारभाई यांनी 'शांताबाई कोपरगावकर' हा देखावा तयार केला. शांताबाई मालक झाल्या आणि पन्नास-साठ लोकांना पोट भरू लागल्या. तीर्थक्षेत्रे आणि जत्रांमध्ये तमाशा प्रसिद्ध झाला आणि भरपूर पैसा मिळवू लागला. मात्र अशिक्षित शांताबाईंची फसवणूक झाली.



अत्तारभाईंनी सर्व स्पर्धा विकल्या आणि शांताबाई उदध्वस्त झाल्या. तो मानसिक आजाराने त्रस्त होता. नवरा नाही, जवळचे नातेवाईक नाहीत. त्यामुळे कोपरगाव बसस्थानक शांताबाईंचे घर बनले.

शांताबाईंचे वय आज ७५ वर्षे आहे. पण विस्कटलेले केस, विस्कटलेल्या साड्या आणि फाटक्या कपड्यांसह शांताबाई अजूनही बस स्थानकावर बसून ओळख जुनी,धरून मनी हे गाणे गायले. शांताबाईचा लकब, अभिनय, हात फिरवणारे आणि चमकणारे डोळे पाहून कुणीतरी शांताबाईचा व्हिडिओ बनवला आणि सोशल मीडियावर पोस्ट केला. खान्देश परिसरातील काही तमाशा कलावंतांनी हा व्हिडिओ पाहून कोपरगाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते अरुण खरात यांना पाठवला. खरात यांनी दोन दिवस शांताबाईचा शोध घेतला आणि अखेर त्या कोपरगाव बसस्थानकात सापडल्या. अरुण खरात व त्यांचे मित्र डॉ. अशोक गावितरे यांनी त्यांना रुग्णालयात नेले व शांताबाईंना वैद्यकीय मदत केली. शांताबाईंना सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत अत्यंत तुटपुंजी असल्याने त्यांच्यावर हलाखीचे जीवन जगण्याची वेळ आली आहे. राज्य सरकारने त्यांना वैद्यकीय मदत आणि वाढीव मानधनात राहण्यासाठी घर द्यावे, असे डॉ. अशोक गावितरे म्हणाले.















# माऊलींची पालखी जिल्ह्यात दाखल; दर्शनासाठी भाविकांची गर्दी

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जिल्ह्यातील पालखी प्रवेशानंतर माऊलींची पालखी पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृह येथे विसाव्यासाठी थांबली असता पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील वारकरी भाविक व ग्रामस्थांनी अलोट गर्दी केली होती. टाळ मृदंगाचा गजर आणि मुखाने हरिनामाचा जयघोष करीत वारकरी पालखी सोहळ्यात तल्लीन झाले होते. प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर विठ्ठलाच्या दर्शनाची आस दिसत होती. धर्मपुरी येथे विसावा घेतल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या मुक्कामासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलीची पालखी मार्गस्थ झाली. नातेपुते येथे पालखी मुक्कामास विसावली.**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सकाळी बरड (ता. फलटण) येथून धर्मपुरी (ता. माळशिरस) सरहद्दीवर १० वाजून ४० मिनिटांनी पोहोचला. सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर दुपारच्या विसाव्यासाठी पालखी सोहळा कारुंडे (ता. माळशिरस) येथे ११ वाजून ३८ मिनिटांनी पोहोचला.

धर्मपुरी येथे पालखी स्वागतानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माऊलींच्या रथाचे सारथ्य केले. यावेळी विभागीय आयुक्त सौरभ राव, खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, आ. राम सातपुते, परभणीचे खा. संजय जाधव, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर आदी उपस्थित होते.

पालखी स्वागतानंतर प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधींनी हरी नामाचा गजर करीत पालखी सोहळ्याबरोबर पालखी विसावा ठिकाणापर्यंत चालण्याचा आनंद लुटला. सोलापूर जिल्ह्यात माऊलींच्या पालखीचे आगमन सकाळी १०.४० वाजता धर्मपुरी बंगला येथे झाले. तत्पूर्वी, सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खीलारी, पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी माऊलींच्या पालखीला भावपूर्ण निरोप दिला.

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज

पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक सेवा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी केली आहे. पालखी मार्गावर स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी शौचालये, आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. वारकरी भाविकांना वारीत कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रशासनाने योग्यती खबरदारी घेतली आहे. धर्मपुरी येथे पालखी अगमनापूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने विविध जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आहे. यामध्ये आरोग्य शिक्षण, लेक लाडकी, पर्यावरण रक्षण, प्रदूषण मुक्ती, स्वच्छ्ता या विषयांचा प्रामुख्याने समावेश होता.

### मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण

धर्मपुरी येथे माऊलीच्या पालखी स्वागतासाठी उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. पालखी सोहळ्यात आरोग्य विभागाने वारीमधील महिला वारकऱ्यांसाठी सॅनिटरी पॅड व स्तनदा मातासाठी हिरकणी कक्ष सेवा उपलब्ध करून दिली आहे. धर्मपुरी येथे आरोग्य विभागाने उभारलेल्या तात्पुरत्या अतिदक्षता कक्षास पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देऊन माहिती घेतली.




## पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना अन्नदान

**अकलूज** : येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने जगद्गुरु तुकाराम, व श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वैष्णवांना सुमारे २४ हजार भाकरी व १२५ किलो बेसनाचे पिठले, ठेचा लोणचे अशा अस्सल ग्रामीण आस्वादाचे अन्नदान करण्यात आले. तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वैष्णवांना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते अन्नदान वाटप करण्यात आले. यावेळी दिपकराव खराडे पाटील संस्थेचे सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील प्रमुख उपस्थित होते. जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे दि. २४ जुन रोजी अकलूज येथे आगमन होत आहे. पालखीचा आदल्या दिवशीचा मुक्काम सराटी(जि.पुणे) येथे असतो. लाखो वैष्णव आदल्या दिवशीच मुक्कामाला अकलूजला येतात. त्यांना घरगुती अन्नदान व्हावे या हेतूने सन २०१५ पासून शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांनी या उपक्रमाला सुरुवात केली. अन्नदान वाटपाचे हे ९ वे वर्ष आहे. यावेळी मुख्याध्यापिका सुनिता वाघ, संजय गळीतकर,प्रा.राहूल सुर्वे, अमोल फुले,सौ सविता गायकवाड, शिवाजी पारसे, आदी उपस्थित होते.

## १२० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधून पंढरपूरवर ठेवली जातेय करडी नजर

**पंढरपूर** : आषाढी यात्रा सोहळ्याची लगबग विठूरायाच्या नगरीत सुरू झाली असून आत्तापासूनच भाविकांची पंढरीत मोठी गर्दी होऊ लागली आहे. वारीसाठी आलेल्या भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांकडून शहरात १२० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. यंदा आषाढी एकादशी दिवशी भाविकांची लाखोंच्या संख्येने पंढरीत गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदा प्रथमच मोठ्या संख्येने सीसीटीव्ही कॅमेरे शहरात उभारण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही कॅमेरावरुन गर्दीवर नियंत्रण ठेवणे, गर्दीच्या ठिकाणी पोलिसांशी संपर्क साधणे असे कंट्रोल रुममधून केले जाणार आहे.या संदर्भात पंढरपूर शहर पोलीस निरिक्षक अरुण फुगे म्हणाले कि, पंढरपूर शहर पोलीस ठाण्यातून याचे नियंत्रण केले जात आहे. चंद्रभागा वाळवंट, नगर प्रदक्षिणा , मंदिर परिसर ,शहरातील मुख्य रस्ते ,चौक अशा सर्वच ठिकाणी हे सीसीटीव्ही कॅमेरे तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत पाच कोटी रुपये खर्चून लावण्यात आले आहेत.त्यामुळे पंढरीत पोलिसांची आता आणखी करडी नजर राहणार आहे. दरम्यान कुठेही गर्दीत भाविकांच्या जीवितास धोका होऊ नये, अनुचित प्रकार घडू नये यासाठी यंदाच्या वारीत प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने कॅमेऱ्याची नजर संपूर्ण वारीवर आणि भाविकांच्या गर्दीवर असणार आहे.




## विठ्ठल मंदिराच्या सभा मंडपास शाही राजवाड्याचे स्वरुप

सुराज्य/पंढरपूर

सावळ्या विठुरायाच्या मंदिरातील पेशवेकालीन सभा मंडपला आणि रुक्मिणी सभामंडपाला आता शाही साज चढवण्यात आला असून विठुरायाची राऊळी एखाद्या राजवाड्याप्रमाणे सजू लागली आहे. पेशवेकालीन सागवानी सभा मंडपात रंगीबेरंगी पडदे, झुंबर आणि आकर्षक फुलांच्या सजावटीने संपूर्ण मंदिराचे रुपडे पालटले गेले आहे.

आषाढी यात्रेच्या सोहळ्यात मोजके दिवस शिल्लक आहेत. अशातच पंढरपुरात आषाढी एकादशीच्या सोहळ्याच्या तयारीची लगबग सुरु आहे. विठ्ठल मंदिर देखील संपूर्णपणे सजावट करुन भाविकांच्या आणि संतांच्या स्वागतासाठी सज्ज करण्याची तयारी होत आहे. यामध्येच विठ्ठल मंदिरातील पेशवेकालीन सभामंडप आणि रुक्मिणी मातेचा सभामंडप हा आकर्षक पद्धतीने सजवण्यात येत आहे. यासाठी केशरी आणि पिवळ्या अशा मलमली कापडाची सजावट, आकर्षक छत, फुलांचे झुंबर, फुलांच्या माळा, आकर्षक प्रकाश योजना अशा माध्यमातून संपूर्ण सभा मंडप सजवून टाकण्यात येत आहे, याचबरोबर लायटिंगमध्ये निर्माण करण्यात आलेली सर्व संतांची तैलचित्र देखील या ठिकाणी लावण्यात आली आहेत. एखाद्या शाही राजवाड्याचे स्वरुप विठ्ठल मंदिराच्या सभा मंडपास आले आहे.





गजानन महाराजांची पालखी शुक्रवारी सातरस्ता येथील उपलप मंगल कार्यालयात मुक्कामी विसावली. दिवसभर दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

## एकनाथ महाराजांच्या पालखीचे तिसरे रिंगण

**बार्शी** : संत एकनाथ महाराजांची पालखी धाराशिव जिल्ह्यात आहे. पालखी सोहळ्याचे तिसरे रिंगण परंडा तालुक्यातील नांगरडोह या परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाले. गेल्या अनेक दिवसापासूनची असलेली परंपरा अनुसार या परिसरातील भाजी भाकरीच्या उंबरा वर्गणीतून वारकऱ्यांना वनभोजनाची महापंगत गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आली. या वनभोजनामुळे सोहळ्यातील वारकरी तृप्त झाले.

## संत मुक्ताईच्या पालखीचे बार्शी तालुक्यात स्वागत

सुराज्य/बार्शी

महाराष्ट्रातील सात मानाच्या समजल्या जाणाऱ्या पालख्यांपैकी एक असलेल्या आदिशक्ती संत मुक्ताबाई पालखीचे शुक्रवार दि २३ रोजी दुपारी दीडच्या सुमारास सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले. मुक्ताबाई... मुक्ताबाई.. आदिशक्ती मुक्ताबाई! च्या गजरात बार्शी तालुक्यातील शेंद्री हद्दीत वारदवाडी फाटा येथे या पालखीचे आमदार राजेंद्र राऊत, मुद्रांक जिल्हाधिकारी गोविंद गीते यांच्यासह, तहसीलदार एफ आर शेख यांनी स्वागत केले.



यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे, निवासी नायब तहसीलदार बडे, निवडणूक नायब तहसीलदार संजीवन मुंडे, शेंद्रीचे सरपंच महादेव चव्हाण यांच्यासह वारकरी व भाविक उपस्थित होते.

शेकडो वर्षांची परंपरा असलेली हा पालखी सोहळा जळगाव जिल्ह्यातील श्री क्षेत्र मुक्ताईनगर येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे विठुरायाच्या दर्शनासाठी दि २ जून रोजी निघाला असून शुक्रवारी पालखीचे धाराशिव जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले. यावेळी संत मुक्ताईच्या पादुका आमदार राजेंद्र राऊत व तहसीलदार एफ आर शेख यांनी डोक्यावर घेऊन स्वागतस्थळी आणल्या. पालखी सोहळा प्रमुख रवींद्र महाराज हरणे, पंकज महाराज पाटील, नितीन महाराज अहिर, विशाल महाराह खोले, लखन महाराज पाटील, दिपक महाराज पाटील आदींसह वारकरी, भाविक, ग्रामस्थ उपस्थित होते. १२०० वारकरी सहभागी झाले आहेत.

## उष्णतेपासून संरक्षण मिळण्यासाठी छत


**पंढरपूर** : भाविकांना ऊन लागू नये म्हणून मंदिर परिसरात सर्व मार्गावर उष्णतारोधक पांढऱ्या रंगांचे पट्टे मारण्यात आले आहे. डोक्यावर शेडनेटचे छत दिले आहे. दर्शन रांगेत देखील पायाखाली या उष्णतारोधक पांढऱ्या रंगांचे पट्टे देऊन त्यावर मॅट टाकण्यात येणार आहे. भाविकांना उष्माघाताचा त्रास जाणवू नये यासाठी शासनाने खबरदारी घेण्याचा निर्णय घेतला आहे.



## माळखांबीत तुकोबांच्या पालखी सोहळ्याची तयारी पूर्ण

सुराज्य/श्रीपूर

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २६ जून २०२३ रोजी सकाळी साडेसात वाजता आणि संत श्री सोपान काका यांचा पालखी सोहळा २५ जून रोजी माळखांबी मध्ये दाखल होणार आहे. पालखी सोहळ्याची पूर्वतयारी सरपंच मंगल पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीकडून सुरू आहे.



गावामध्ये गावठाण, भवानीनगर येथील गटार स्वच्छता केलेली असून निघालेला कचरा गावाबाहेर उपसरपंच प्रभाकर गणपत गमे पाटील यांची स्वतःचे मालकीचे ट्रॅक्टरने वाहून गावाबाहेर नेऊन टाकलेला आहे. स्वतःचा ट्रॅक्टर उपसरपंच गणपत गमे पाटील यांनी विनामूल्य उपलब्ध करून दिलेला आहे. याव्यतिरिक्त गावामध्ये गावठाण, भवानीनगर आणि वाड्यावस्तीवर साफसफाई रस्त्याच्या कडेची काटेरी झाडे झुडपे काढणे, गावामध्ये सार्वजनिक शौचालय उभारणे, मुतारी बांधकाम, गावाच्या आसपासच्या पिण्याच्या पाण्याची स्त्रोत पाणी निर्जंतुकीकरण करणे, गटाराच्या व रस्त्याच्या बाजूला गटार पावडर टाकून डास होणार नाहीत याची काळजी घेणे, माळखांबी गाव व वाड्या वस्तीवर दिवाबत्तीची सोय करणे तसेच वारकरी यांची सेवा करण्याच्या दृष्टीने गावांमध्ये विकास कामे चालू असून तसेच गावामध्ये पालखी सोहळ्या मधील वारकरी यांना स्नानगृह शौचालय युनिट यांसारख्या सुविधा ग्रामपंचायत मार्फत पुरविण्यात येणार आहेत.

यामध्ये सरपंच मंगल पुजारी, उपसरपंच प्रभाकर गणपत गमे-पाटील, सदस्य बाळासाहेब महादेव वाघमारे, संजय गुलाब साठे, अनिल राजाराम निंबाळकर आणि महिला सदस्या रोहिणी लहू पाटील, प्रतिभा दयानंद शेळके, ज्योती चंद्रकांत सरतापे, हेमलता अनिल जावीर या सर्वांचे पालखीची कामे करण्यासाठी सहकार्य लाभत आहे.



## खंडाळीत छोट्या वारकऱ्यांची दिंडी

सुराज्य/श्रीपूर

सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या ज्ञानेश्वर माऊलीं नाखंडाळीतील जि. प. शाळा छोट्या वारकऱ्यांनी दिंडी काढत धोंड धोंड पाणी दे ,साय माय पिकू दे अशी साद घालती आहे.

विठू नामाचा जयघोष करत खंडाळी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक, व्यवस्थापन समिती सर्वांनी पालखी सोहळ्याचा आनंद साजरा केला. विठ्ठलाला, ज्ञानेश्वर माऊली व तुकाराम महाराजांच्या पालखीला पाऊस पाणी भरपूर पडू दे, सर्व शेतकरी वर्ग सुखावू दे, अशी प्रार्थना करत पालखी सोहळा संपन्न झाला. महादेवाच्या मंदिराजवळ गोल रिंगण सादर केले.